संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 3 | Issue : 1 | Marathi Monthly | Thane, 1 July 2025 to 31 July 2025 | Pages 16 | Price : 10/-

# मराठी ही जगातील एकमेव निसर्ग-पर्यावरणस्नेही भाषा!

## ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांचे मातृभाषेप्रती गौरवोद्गार...

**मराठी माणसाचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय हक्क डावलण्याचे कारस्थान, दिल्ली-दरबारी शिजल्यानंतर महाराष्ट्रद्रोही भाजपाने आता, त्यासाठी कंबर कसून, आपले मराठीद्वेष्टे राजकारण सुरु केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून, राज्यभरातील शाळांमध्ये पहिलीपासूनच तिसरी भाषा म्हणून, हिंदीसक्तीचा निर्णय राज्यशासनाकडून जाहीर करण्यात आला होता.**



**मुंबई (प्रतिनिधि) :** आगामी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसह, ठाणे आणि नवी मुंबईसोबतच, महाराष्ट्रातील इतर महत्त्वाच्या शहरांतील येऊ घातलेल्या महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, भारतीय जनता पक्षाने, राज्यातील हिंदी-भाषिकांना चुचकारण्याचे प्रयत्न सुरु केले असून, परप्रांतीयांची एकगठ्ठा मतं भाजपाच्या पारड्यात पाडून, मुंबई महानगरपालिकेवर सत्ता स्थापन करण्याचा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसांचा मनसुबा आता लपून राहिलेला नाही. मराठी माणसाचा सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय हक्क डावलण्याचे कारस्थान, दिल्ली-दरबारी शिजल्यानंतर महाराष्ट्रद्रोही भाजपाने आता, त्यासाठी कंबर कसून, आपले मराठीद्वेष्टे राजकारण सुरु केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून, राज्यभरातील शाळांमध्ये पहिलीपासूनच तिसरी भाषा म्हणून, हिंदीसक्तीचा निर्णय राज्यशासनाकडून जाहीर करण्यात आला होता. यामाध्यमातून मराठीची गळचेपी करुन, महाराष्ट्राच्या अधिकृत राजभाषेला दुय्यम दर्जा देण्याचा कट आखला जात असतानाच, महाराष्ट्रातील समविचारी पक्ष आणि संघटनांनी आक्रमक भूमिका घेत, या निर्णयाला कडाडून विरोध केला. ‘मराठी अभ्यास केंद्रा’चे निमंत्रक प्रा. डॉ. दीपक पवार यांच्या पुढाकाराने, प्राथमिक शिक्षणातील तिसऱ्या, पर्यायाने हिंदी भाषेच्या सक्तीविरोधात मराठीप्रेमी नागरी समाज आणि राजकीय नेत्यांच्या उपस्थितीत अन्याय्य शासननिर्णयाची प्रतीकात्मक होळी आणि जाहीर सभेचे रविवार, दि. २९ जून-२०२५ रोजी, मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजन करण्यात आले होते. या सभेला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माकपचे अजित नवले आणि ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष, ज्येष्ठ कामगारनेते राजन राजे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना राजन राजे यांनी, ‘धर्मराज्य पक्षा’ची मराठीवादी भूमिका प्रकर्षाने मांडली. संयुक्त महाराष्ट्रानंतर... आता, ‘स्वायत्त महाराष्ट्र’ ....राष्ट्रांतर्गत राष्ट्र ‘स्वायत्त महाराष्ट्र’.... ‘शिवछत्रपती-राष्ट्र’ !!! हीच आमची महाराष्ट्र-धर्माची खरीखुरी व्याख्या असून, राजकीयदृष्ट्या आमची ताकद कमी असली तरी, मराठी भाषा आणि मराठी माणूस या दोन गोष्टींबाबत, आम्ही कमालीचे कडवट आहोत, असे त्यांनी आवर्जून सांगितले. यावेळी बोलताना राजन राजे पुढे म्हणाले की, ‘मराठी अभ्यास केंद्रा’च्या ...पृष्ठ क्र. ७ वर

## महाराष्ट्र-धर्माची चाड असेल तर, सापळ्यात न अडकता नीट वाचा आणि विचार करा...

मध्ययुगीन भारतात शिवाजी महाराजांनी, उत्तरेचं आक्रमण परतवून लावता येतं, हे दाखवून दिलं आणि नंतर, मुघलसत्तेच्या शेवटाची आणि ऱ्हासाची सुरुवात इथूनच झाली. तब्बल सत्तावीस वर्षे, औरंगजेब इथे प्रयत्न करुनही, लढाया जिंकूनही युद्ध जिंकू शकला नाही आणि निर्णायक विजय मिळवू शकला नाही. या दीर्घकालीन युद्धाने, मुघल साम्राज्याची आर्थिक-लष्करी घडी मोडली आणि साम्राज्य लयाला गेलं.

इंग्रज काळापासून तत्कालीन भारतातले मोजकेच प्रांत होते, ज्यांनी उद्योग-शिक्षण-साहित्य-प्रबोधन-राजकारण-चळवळी, सगळ्याच बाबतीत संपूर्ण ...पृष्ठ क्र. ७ वर

## वसंतराव पाटील आणि संजय सूर्यवंशी...कामगार-धर्म जोपासणारे ‘LG हिंग’ कंपनीतील ‘धर्मराज्य’चे सच्चे गुणवंत कामगार...!!!

...पृष्ठ क्र. ६ वर


अंतरंग




स्वायत्त महाराष्ट्र......
...निवृत्ती विठ्ठल बांदल
पृष्ठ क्र. ४




कुठल्याही कंपनीतील कामगार-कर्मचाऱ्यांनी मुद्दामहून वाचावं, असं काही....
- राजन राजे
पृष्ठ क्र. ८

मराठीच्या मरणकळा आणि फडणवीस यांचे वकिली चातुर्य
- योगेश कुटे
पृष्ठ क्र. १४



“इंदिरा गांधींचं परराष्ट्र धोरण : धर्मावर नव्हे, न्यायावर उभं राष्ट्र”
- निरंजन टकले
पृष्ठ क्र. १६

# ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात बदली झालेल्या, भ्रष्ट महिला अधिकारीवर कारवाई करा!

## ‘धर्मराज्य पक्षा’ची मागणी : राज्याच्या प्रधान सचिवांना दिला आंदोलनाचा इशारा...

**ठाणे (प्रतिनिधी) :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत कार्यरत असणाऱ्या, भ्रष्टाचारी महिला अधिकारी श्रीमती दी.प्र. सावंत यांची, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर-रचना विभागात बदली झालेली असून, या महिला अधिकारीच्या विरोधात आर्थिक भ्रष्टाचाराच्या अनेक तक्रारी प्रशासनाकडे आलेल्या आहेत. **ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास घाणेकर यांनी, या महिला अधिकारीविरोधात राज्य शासनाकडे अनेक तक्रारी केल्या होत्या; मात्र, श्रीमती सावंत या, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या ज्या विभागात कार्यरत होत्या, त्या विभागाने शासनाला कोणताही अहवाल न दिल्याने, त्यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. दरम्यानच्या काळात, लाचलुचपत विभागाने रचलेल्या सापळ्यात, सदर महिला अधिकारी लाच स्विकारताना आढळूनही आल्या होत्या. सद्यस्थितीत, त्यांच्याविरोधात न्यायालयीन खटला सुरु असल्याची माहिती आहे.** दरम्यान, लाचखोरीचा किंवा आर्थिक घोटाळा तसेच, भ्रष्टाचाराचा आरोप असलेल्या व्यक्तीस सेवेत ठेवता येत नसल्याचा शासन-निर्णय असतानादेखील, ठाणे शहरातील एका सत्ताधारी पक्षाच्या नेत्याने, आपले राजकीय वजन वापरुन, संबंधित महिलेची ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर-रचना विभागात बदली केलेली आहे. याबाबतचा दि. ११ जून-२०२५ रोजीचा, शासन आदेश क्रमांक : बदली-५८२४/प्र.क्र. १०/नवि-२७ (संदर्भ : नगर विकास विभाग, शासन आदेश क्र. बदली-५८२४/प्र.क्र.१११/नवि-२७, दि. १५.१०.२०२४) असा शासन-निर्णय पारित झालेला आहे. सदर प्रकार हा, राजकीय दबावाबाबतची कृती, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम-१९७९ मधील नियम-३(३) व २३चे उल्लंघन करणारी असल्याने, ती गैरवर्तणूक समजण्यात यावी.

तसेच, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर-रचना विभागात करण्यात आलेल्या, संबंधित महिला अधिकारीच्या, बदलीबाबत सखोल चौकशी करुन, तिच्याविरोधात शिस्तभंगाच्या अनुषंगाने, योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ‘धर्मराज्य पक्षा’चे ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर यांनी, महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव के.एच. गोविंदराज आणि ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे. याच पार्श्वभूमीवर ज्येष्ठ सामजिक कार्यकर्ते श्रीनिवास घाणेकर यांनी, याप्रकरणी ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांच्याशी चर्चा केल्यानंतर, यासंदर्भात आपण जातीने लक्ष घालू असे त्यांनी, त्यांना आश्वस्त केले.

दरम्यान, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयास, आपल्या अधिकारात योग्य ते आदेश द्यावेत, अशी आग्रही मागणी, महेशसिंग ठाकूर यांनी, आपल्या पत्रातून केली असून, याबाबत कारवाईस दिरंगाई अथवा प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचे आमच्या लक्षात आल्यास, ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर, लोकशाहीमार्गाने आंदोलन पुकारण्यात येईल, असा थेट इशारा पत्राच्या शेवटी देण्यात आला आहे.

# ठाणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत, नागरिकांनी ‘मतदार-राजा’ची भूमिका डोळसपणे बजावावी!

## ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांचे ठाणेकरांना आवाहन...

**ठाणे (प्रतिनिधी) :** आगामी ठाणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत, सर्वसामान्य नागरिकांनी जागरुक राहून खऱ्या ‘मतदार-राजा’ची भूमिका डोळसपणे बजावावी, असे आवाहन ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांनी केले आहे. ठाणे शहरात विकासकामांच्या नावाखाली, सर्वसामान्य करदात्या ठाणेकर नागरिकांची होणारी कुचंबणा, मेट्रो कामातील दिरंगाई, रस्त्यावरील खड्डे आणि त्यातून निर्माण होणारी प्रचंड वाहतूक कोंडी, यामुळे ठाणेकर जनता गेल्या काही वर्षांपासून हाल सहन करीत असून, याचाच निषेध करण्यासाठी ठाणे काँग्रेसच्या वतीने, जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखाली शुक्रवार, दि. २७ जून-२०२५ रोजी, घोडबंदर येथील आनंदनगर नाका, कासारवडवली येथे एकदिवसीय ‘लक्षवेधी-आंदोलन’ पुकारण्यात आले होते. या आंदोलनाला ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांनी उपस्थित राहून, ठाणे महानगरपालिका प्रशासन आणि राज्य शासनाच्या भोंगळ कारभाराचा निषेध केला. गेल्या कित्येक वर्षांपासून ठाणे शहरातील मेट्रो प्रकल्प रखडलेला असल्याने, त्यामुळे घोडबंदर रस्त्यावर रोजचीच वाहतूक कोंडी निर्माण होत असते. त्यातच अत्यंत निकृष्ट दर्जाचे बांधकाम साहित्य वापरुन तयार केलेले रस्ते म्हणजे, अपघाताला निमंत्रण ठरत आहेत. या संपूर्ण कामात मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार झाल्यानेच, ठाणेकर नागरिक ‘करदाता’ असूनही, त्यांना त्यांच्या हक्काची नागरी-सुविधा मिळत नाही.

याप्रकरणी ‘धर्मराज्य पक्षा’च्या माध्यमातून सातत्याने प्रशासनाकडे पाठपुरवा करण्यात येऊनही, ठाणे महानगरपालिका आणि महाराष्ट्र शासन अक्षरशः गेंड्याच्या कातडीसारखे बनून राहिलेले आहे. संबंधित प्रशासकीय अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि ठेकेदार यांच्या अभद्र युतीमुळेच, आज ठाणेकरांच्या वाट्याला ही वेळ आली असल्याची टीका राजन राजे यांनी यावेळी केली. दरम्यान, आगामी ठाणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत, सर्वसामान्य नागरिकांनी खऱ्याखुऱ्या ‘मतदार-राजा’ची भूमिका डोळसपणे बजवावी, असे आवाहनदेखील त्यांनी यावेळी बोलताना केले.

# आचार्य अत्रे विरुद्ध यशवंतराव चव्हाण....

१ डिसेंबर १९५५ रोजी अत्र्यांनी शिवाजी पार्कमध्ये केलेल्या जाहीर भाषणात चव्हाणांवर गंभीर स्वरुपाचे आरोप केले. ते वाचून चव्हाण इतके भडकले की त्यांनी २३ डिसेंबरच्या लोकसत्तेत पुढील पत्र प्रसिद्ध केलं. माझ्या असं नजरेस आणण्यात आलं आहे की, श्री. प्र.के. अत्रे यांनी ११ डिसेंबर रोजी शिवाजी पार्कवर जे भाषण केलं, त्यामध्ये माझ्यासंबंधी खालील विधानं केली. मी एका गुन्ह्यात अडकलो आहे व त्यासंबंधीचे कागदपत्र मुख्यमंत्री श्री. मुरारजी देसाई यांचे हातात असल्यामुळे ते मला केव्हाही पकडू शकतात व माझी कातडी बचावण्यासाठी मी महाराष्ट्राशी द्रोह केलेला आहे,... हे सर्व आरोप सर्वस्वी निराधार व असत्य आहेत ... मी श्री. अत्रे यांना असं आव्हान देतो की, हे आरोप त्यांनी स्वतःच्या सहीनिशी प्रसिद्ध करावेत....

१ जानेवारीच्या ‘नवयुग’ च्या अंकात ‘चव्हाणांना प्रतिआव्हान’ या मथळ्यानिशी अत्र्यांनी पुढील मजकूर प्रसिद्ध केला. ‘‘मला अनेक गोष्टी माहीत असून त्यांची वाच्यता करता येत नाही. कारण यशवंतराव मंत्रिपदावर असेतोपर्यंत माझ्या जवळचे साक्षीदार पुढे येण्यास घाबरताहेत. म्हणून मी यशवंतरावांना पुन्हा जाहीर आव्हान देतो की, त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देऊन खाली उतरावं आणि माझ्याप्रमाणे सामान्य नागरिकाच्या पातळीवर यावं, म्हणजे मग माझ्याजवळ असलेल्या त्यांच्या एकेक भानगडीचा कुतुबमिनार मी त्यांच्यापुढे उभा करतो.’’

अत्र्यांचं हे प्रतिआव्हान यशवंतरावांनी स्विकारल्याचा पुरावा प्रस्तुत लेखकाला आजतागायत आढळलेला नाही.

*...सुनिल कर्णिक*

– य.दि. फडके, ‘विसाव्या शतकातील महाराष्ट्र’, खंड ८, पानं १९३ – ४. मौज प्रकाशन, २००७.

# समताधिष्ठीत राजकारण टिकवण्यासाठी, काँग्रेस हाच योग्य पर्याय!

## धनंजय शिंदे यांची ‘कृष्णार्पणमस्तु’ला मुलाखत





**प्रश्न : आम आदमी पक्षाचे महाराष्ट्र उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असताना, अचानक अरविंद केजरीवालांची साथ सोडून काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याचे कारण काय?**

**उत्तर :** छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी प्रामाणिक राहण्यासाठी काँग्रेसमध्ये परतणे गरजेचे होते. आम आदमी पक्षात सत्तेच्या राजकारणात फसवे आणि दिखाऊ धोरणांना प्राधान्य दिले जात असल्याचे दिसले. भाजप सरकार अदानी-अंबानीसारख्या भांडवलदारांच्या हितासाठी जनतेच्या हक्कांवर आघात करत आहे. याविरोधात लढण्यासाठी आणि धर्मनिरपेक्ष, समताधिष्ठित राजकारण टिकवण्यासाठी काँग्रेस हाच योग्य पर्याय आहे. म्हणून, एप्रिल २०२५ मध्ये काँग्रेसमध्ये घरवापसी केली.

**प्रश्न : अरविंद केजरीवालांचा उदय अण्णा हजारेंच्या आंदोलनातून झाला, त्यावर अण्णांनी नाराजी व्यक्त केली होती. तीच नाराजी नंतरच्या काळात केजरीवालांना भोवली असावी का?**

**उत्तर :** अण्णा हजारेंच्या आंदोलनाने भ्रष्टाचारविरोधी भावना जागृत केली, पण केजरीवालांनी ती सत्ताकारणासाठी वापरली. अण्णांची नाराजी, जनतेच्या अपेक्षांशी अप्रामाणिकपणा आणि जाहिरातबाजीवर अवलंबून राहिल्याने लोकांचा विश्वास डळमळला. भांडवलदार आणि सरकारी लॉबीशी जवळीक यामुळे केजरीवालांचे राजकारण विश्वासार्हतेच्या संकटात सापडले, असे मला वाटते.

**प्रश्न : दारु घोटाळ्याच्या आरोपांवरून झालेल्या अटकेबद्दल तुम्ही केजरीवालांना दोषी मानता का?**

**उत्तर :** न्यायालय अंतिम निर्णय देईल, हे खरे. पण, स्वच्छ आणि पारदर्शी राजकारणाच्या नावावर सत्ता मिळवून, भांडवलदारांच्या साथीने आणि जाहिरातबाजीच्या जोरावर राजकारण करताना भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप लागणे दुर्दैवी आहे. अशा प्रकरणांमुळे लोकशाहीला धोका निर्माण होतो. दोषी आढळल्यास कठोर शिक्षा व्हावी, ही माझी ठाम भूमिका आहे.

**प्रश्न : महाराष्ट्रात आम आदमी पक्ष मोठ्या प्रमाणात न वाढण्याचे कारण काय सांगाल?**

**उत्तर :** महाराष्ट्रात शिवाजी महाराज, शाहू, फुले, आणि आंबेडकर यांचा वैचारिक आणि चळवळीचा वारसा आहे. इथले लोक पोकळ जाहिरातीपेक्षा ठोस कामाला महत्त्व देतात. ‘आप’ पक्षाची दिल्लीतील भांडवलदारांशी जवळीक, खोटी आश्वासने आणि स्थानिक प्रश्नांशी दुरावलेपण यामुळे त्यांना महाराष्ट्रात यश मिळाले नाही. भाजप सरकार अदानी-अंबानींना मोठे प्रकल्प विकत असताना, ‘आप’ने ठोस भूमिका न घेतल्याने जनतेचा विश्वास गमावला.

**प्रश्न : आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेसला यश मिळवून देण्यासाठी काय नियोजन कराल?**

**उत्तर :** मुंबईच्या मूळ रहिवाशांचे हक्क, रोजगार, झोपडपट्टी पुनर्वसन, स्वच्छ पाणी, सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण यावर काँग्रेसचा भर असेल. भाजप सरकार अदानी-अंबानींना मुंबईतील जमिनी आणि प्रकल्प विकत आहे, ज्यामुळे मुंबईची संस्कृती आणि कष्टकऱ्यांचे हक्क धोक्यात आले आहेत. या भांडवली दडपशाहीला आळा घालून, मुंबईकरांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी, ठोस कृती आराखडा तयार करू. युवक, महिला आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी काँग्रेसची ताकद वाढवणार आहे.

**प्रश्न : मुंबई विकायला काढल्याच्या आरोपावर काँग्रेसची भूमिका काय असेल?**

**उत्तर :** भाजप सरकार अदानी-अंबानी आणि भांडवलदार लॉबीच्या फायद्यासाठी मुंबईच्या जमिनी, झोपडपट्ट्या आणि गिरणी कामगारांच्या जागा विकत आहे. यातून भूमिपुत्र आणि कष्टकऱ्यांना हद्दपार करण्याचा डाव आहे. काँग्रेस मुंबईकरांचे हक्क जपेल, पुनर्वसनातील भ्रष्टाचाराला आळा घालेल, स्थानिकांना विकासात प्राधान्य देईल आणि मुंबईचा विकास खऱ्या मुंबईकरांसाठी करेल, ही आमची स्पष्ट भूमिका आहे.

**प्रश्न : गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नावर तुम्ही काय पाऊल उचलणार आहात?**

**उत्तर :** गिरणी कामगारांनी मुंबई उभारली, पण त्यांच्या घरांचा प्रश्न प्रलंबित ठेवण्यात भाजप सरकार आणि बिल्डरलॉबीचा हात आहे. अदानी-अंबानींना जमिनी देताना कामगारांना न्याय देण्याची भाजपाची इच्छा नाही. मी गिरणी कामगार संघटनांसोबत संवाद साधून, काँग्रेसच्या नेतृत्वासोबत न्यायालयीन, प्रशासकीय आणि आंदोलनात्मक मार्गाने हा प्रश्न सोडवण्यासाठी ठोस पावले उचलणार आहे. कामगारांना थेट मालकीची घरे मिळावीत, यासाठी काँग्रेस कटिबद्ध आहे.



वाहतूक शाखेच्या टोईंग व्हॅन घोटाळ्याविरोधात, ठाण्यातील युवा सामाजिक कार्यकर्ते श्री. अजय जेया यांनी, दि. ७ जून-२०२५ रोजी, ठाणे वाहतूक शाखेच्या कार्यालयाबाहेर, जोरदार आंदोलन केले. या आंदोलनाला ठाणेकर नागरिकांनी मोठ्याप्रमाणात उपस्थित राहुन उदंड प्रतिसाद दिला. या सर्वपक्षीय आंदोलनात, ‘धर्मराज्य पक्षा’ने सक्रिय सहभाग घेतला होता. याप्रसंगी ‘धर्मराज्य पक्षा’चे प्रवक्ते श्री. समीर चव्हाण, पक्षाचे ठाणे लोकसभा अध्यक्ष श्री. राजेश गडकर, ठाणे लोकसभा उपाध्यक्ष श्री. सचिन शेट्टी आणि ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# स्वायत्त महाराष्ट्र......

एकशे सहा हुतात्म्यांच्या रक्ताचा अभिषेक घालूनच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला. प्रांतवार, व भाषेच्या आधारावर राज्याची निर्मिती झाली. स्वतंत्र भारतात राज्यांना व्हिसा कायदा १९६० अन्वये विशेषाधिकार मिळाले. राज्यांना त्यांचे कायदे नियम विधिमंडळात बनवता येतात असं स्पष्ट अधिकार राज्यांना मिळाले. **देशातील अनेक राज्यांनी त्या अधिकारांचा वापर करून तेथील मुळ निवासी भूमीपुत्र, तेथील भाषा संस्कृती आणि परंपरा यांच्या न्यायिक अधिकाराचे जतन व्हावे संरक्षण व्हावे, त्यांना सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शासकियक्षेत्रात प्राधान्याने संधी मिळावी म्हणून त्यांच्या हिताचे अनेक कायदे विधिमंडळात बनवून, आधी स्थानिक भूमिपुत्र आणि त्यांची स्वायत्तता सुनिश्चित केली. महाराष्ट्रातील राजकीय लोकांकडून मात्र हे झाले नाही, त्याचे परिणाम महाराष्ट्रातील मराठी माणूस आज भोगतोय. कधी भाषेसाठी, कधी न्यायिक अधिकारासाठी तर, कधी स्वतःच्याच भूमीत स्वतःच्याच अस्तित्वासाठी झगडतोय. असं वाटतंय आता सगळंच उलथून टाकल पाहिजे. देशात महाराष्ट्र नसून, महाराष्ट्रात अख्खा देश अशी महाराष्ट्राची स्थिती झाल्याने महाराष्ट्र व मराठी माणूस नाडला, पिडला आणि भरडला जातोय, सर्वच क्षेत्रात तो मागे पडलाय आणि पडत चाललाय.** परप्रांतीय लोकांकडून स्थानिकांचे व्यवसाय, रोजगार , नोकऱ्या , सर्वच क्षेत्रातील संधी हिसकावून घेतली जाते, याची ना कोणत्या राज्यकर्त्यांना खबर ना कोण्या स्थानिक मराठी नेतृत्वाला कदर. ज्यांना महाराष्ट्रातील मराठी माणसाच्या हितासाठी आपण निवडून देतो ते लोक विधिमंडळात मराठी माणसाच्या स्वायत्त हक्कासाठी, स्वायत्त महाराष्ट्रासाठी कधीच बोलताना दिसत नाहीत, याऊलट हे लोक गुजराती-मारवाडी व परप्रांतीय लोकांसाठी प्राधान्याने काम करतात असं अनेकदा दिसून आलं आहे. राजकारणात घुसलेल्या मूठभर परप्रांतीय दलालांचा मुख्य हेतू हाच आहे की, परप्रांतीय लोकांसाठी राजकीय लोकांकडून काम करवून घेणे. महाराष्ट्रातील सर्वच महानगरांमध्ये परप्रांतियांना अनधिकृतपणे झोपड्यांमध्ये प्रस्थापित करणे त्यांना हव्या असलेल्या सेवासुविधा पुरविणे, त्यानंतर यांना अनधिकृतपणे व्यवसाय, रस्ते अडवून रोडवरच व्यवसाय, यातील काही लोक गुन्हेगार असतात, ते गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून पुन्हा पळून जातात. या अशा अनधिकृतपणे येणाऱ्या परप्रांतीयांच्या लोंढयांमुळे येथील पोलिस स्थानके, येथील प्रशासकीय यंत्रणा, मग ती शैक्षणिक, आरोग्य, किंवा दळणवळण असो, या सगळ्यांवर प्रचंड प्रमाणात ताण पडत असतो. **परराज्यातील ही मंडळी भ्रष्टाचार, गुन्हेगारी वृत्तीची असते, हे लोक प्रशासनातील आपल्याच लोकांना लाच देऊन सर्वच क्षेत्रात मराठी माणसाच्या**




**हिताची राखरांगोळी करत आहेत आणि आपण ज्यांना निवडून देतो ते आपल्या हितासाठी काहीच करताना दिसत नाहीत हीच मोठी शोकांतिका आहे.** महाराष्ट्रातील इंच इंच जमिनीवर येथील मराठी माणसांचा हक्क आहे. महाराष्ट्रातील रोजगार नोकऱ्या, प्रशासकीय सेवेत, सगळ्याच क्षेत्रात मराठी माणसाच्या हितासाठी प्राधान्याने आरक्षण टाका, त्याठिकाणी आधी मराठी माणसांना संधी मिळाली पाहिजे, असा कायदा विधिमंडळात करा. प्राधान्याने मराठी भाषा आणि मराठी माणसाच्या हितासाठी त्यांच्या न्यायिक अधिकारासाठी महाराष्ट्रातील राजकीय लोकांकडून स्थानिकांचे हितासाठी कायदे बनविले पाहिजेत. असे कायदे बनविले पाहिजेत की, त्याद्वारे मराठी माणसाचा शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, व्यवसायिक, रोजगाराच्या आड कोणीही येता कामा नये. आधी स्थानिकांच्या हिताचे जतन, मग बाकीचे. तरच, मराठी माणसाच्या हितासाठी काहीतरी केले असे होईल. महाराष्ट्राच्या तिजोरीवर पोसलेल्या राजकिय पुढाऱ्यांनी मराठी आणि मराठी माणसाची गळचेपी करणं आता बंद करावं, स्वायत्तता सुनिश्चित करण्यासाठी तुम्हाला आम्ही मराठी लोक विधिमंडळात पाठवतो ते कशासाठी? स्वायत्त महाराष्ट्र ही काळाची गरजच आहे. पुढाऱ्यांनों मला सांगा तुमच्या घरात कोणी दुसरा येऊन राहीला तर चालेल का?

बरं रहातो आणि तुमच्याच घरातील सगळं बळकावून तुम्हाला मारहाण करून हाकलवून तुमचं अस्तित्व नाकारले तर तुम्हाला चालेल का? आणि मग जर नसेल चालत तर, मग तुम्ही काय करणार? त्यांच्यावर कारवाई करणार त्यांचा नायनाट करणार, पुन्हा घुसखोरी होऊ नये म्हणून तुम्ही पक्का बंदोबस्त करणार बरोबर ना!!

मग हा स्वायत्त महाराष्ट्र मराठी माणसाच्या हक्काचं घर, या घरासाठी हजारो वर्षे मराठी माणसाने संघर्ष केला, रक्त सांडले, अनेकांच्या त्यागातून संघर्ष आणि बलिदानातून ही भुमी मराठी माणसाने राखली. आणि राज्यकारभार तुमच्या हातात आल्यावर तुम्ही मात्र परप्रांतीय लोकांसाठी पायघड्या घालून मराठी माणसाच्या अस्तित्वावरच घाला घातला याची तुम्हाला कल्पना तरी आहे का?

**अजूनही वेळ गेलेली नाही. मराठी माणसाच्या हितासाठी स्वायत्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, राज्याच्या अखत्यारीत विधिमंडळात कायदे बनवून घ्या व मराठी माणसाच्या हितासाठी प्राधान्याने काम करा, कायदे करून सर्वात आधी परप्रांतीय लोंढे थांबवा. गुजराती-मारवाडी व परप्रांतीय लोकांकडून होणाऱ्या मराठी माणसावरील अन्याय अत्याचार थांबवा. मराठी माणसाची सर्वच क्षेत्रात होणारी पिछेहाट व होणारा अत्याचार तसेच, या मराठी माणसाच्या दयनीय अवस्थेला तुम्ही राजकिय पुढारी आणि सत्ताधारी लोकच जबाबदार आहात. पण याची ना, लाज तुम्हाला जाण ना खंत ना खेद.... आता तरी डोळे उघडा आणि मराठी माणसाच्या हितासाठी प्राधान्याने काम करा.**

**संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे**
**ही काळाची गरज आहे.**

**निवृत्ती विठ्ठल बांदल**, ठाणे

---

अतिशय स्वागतार्ह तसेच, आनंदाश्चर्याची बाब ही की, आपल्या मुस्लिम समाजात आणखी एक, एपीजे अब्दुल कलामांच्याही शंभर पावले पुढे, असा अलौकिक प्रतिभेचा पदार्थविज्ञान-शास्त्रज्ञ तयार होत आहे...बिहार सीमेलगतच्या उत्तर प्रदेशातल्या देवरिया जिल्ह्यातील 'सारिम खान' हा, मोहसीन खान आणि झिन्नत खान, या मुस्लिम-दांपत्याचा ११ वर्षाचा अत्यंत तीक्ष्ण बुद्धीचा मुलगा, सध्या भल्याभल्यांना आपल्या बौद्धिक-आविष्काराने तोंडात बोटं घालायला लावतोय!

मुस्लिम समाज, मदरशांमधून नव्हे; तर, अशा बौद्धिक मशागतीतूनच पुन्हा प्रगतीपथावर येऊ शकेल आणि आपल्यातल्या अनिष्ट रुढीवादी धर्ममार्तंडांना-दुढ्ढाचार्यांना शह देऊन...जगभरातील झाकोळलेल्या मानवतेला नव्याने झळाळी प्राप्त करुन देऊ शकेल व जगभराला भेडसावणाऱ्या 'जागतिक तापमानवाढी'सारख्या प्रलयंकारी पर्यावरणीय महासंकटांना, त्यातूनच सुटकेचा मार्ग सापडू शकेल!

आमच्या मुंबई-ठाण्यापासून खेडोपाड्यात पसरलेल्या मराठी मुलामुलींनो, तुम्ही मात्र हळदीच्या डीजेवर वेडेवाकडे नाचत, सार्वजनिक पूजा-गणेशोत्सवाचे मंडप सजवत, गल्लीबोळात वा शेताडात (शेतीत हात काळे करण्याचे कष्ट न घेता) क्रिकेटचे सामने खेळत किंवा गणपती-दहीहंडीचे ढोल बडवत...महाग होत चाललेल्या धनवंतांच्या शहरात, निव्वळ तगून रहाण्यासाठी, तुटपुंज्या पगारावर 'कंत्राटी-कामगार पद्धती'च्या चिखलात, म्हशीसारखे आनंदाने आकंठ लोळत-डुंबत रहा....

...भाजप-संघवाल्यांच्या धर्मविद्वेषी विखारी प्रचाराला बळी पडून 'पंक्चर-पंक्चर' म्हणून मुस्लिम-तरुणाईला हिणवणाऱ्यांनो, तसंही या बदमाष मराठी राजकारण्यांनी भांडवली-व्यवस्थेशी गुन्हेगारी संगनमत करुन तुम्हाला, वरील सर्वप्रकारच्या फाजील उत्सवी-नशेच्या बेफाम नादी लावून...तुमचं 'गुलामी-भविष्य' निश्चित करुन ठेवलेलं आहेच!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांची पोलखोल!

**'द कारवां'च्या नोव्हेंबरच्या अंकातील कव्हरस्टोरीने, निवृत्त सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांची पोल खोललीय...**

**या कव्हरस्टोरीतील काही मुद्दे खालीलप्रमाणे...**

- चंद्रचुडांची कारकिर्द सत्तेला खुश करणारी...
- वडील न्या. यशवंत चंद्रचूड यांनी, मित्र व कायदामंत्री रामजेठमलानीच्या साह्याने, मुलालाही जज करण्याची राबवली होती मोहीम...
- गणपतीच्या आरतीला जरी, पंतप्रधान मोदी स्वतः आले असले तरी, नम्रपणे चंद्रचूड यांनी त्यांना येण्यापासून परावृत्त केले पाहिजे होते, ते त्यांनी केले नाही...
- किमान या घटनेचा माध्यमांवर होणारा उदोउदो टाळता आला असता...
- महाराष्ट्र राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार, भाजपच्या प्रयत्नांमुळे ‍व शिंदेच्या बंडखोरीमुळे कोसळल्यानंतर, सर्वोच्च न्यायालयात जी याचिका् दाखल झालेली होती, त्याची सुनावणी चंद्रचूड यांच्यासमोर असताना, महाराष्ट्राच्या निवडणुकांपूर्वी, महाराष्ट्रीयन वेष परिधान करुन, मोदींनी महाराष्ट्रीयन असलेल्या चंद्रचूड यांच्या घरी जाणे, हे चुकीचा संदेश देणारे ठरले...
- सत्ताधाऱ्यांशी संघर्ष करण्याचे, सत्ताधाऱ्यांना नाराज करण्याचे चंद्रचूड यांनी सतत टाळले...
- रामजन्मभूमीसंदर्भात निकाल देणाऱ्या बेंचमध्येही चंद्रचूड होतेच...
- महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, त्यांनी दिलेला निकाल असो किंवा दिल्लीच्या राजकीय घडामोडींसंदर्भात दिलेला निकाल असो किंवा राममंदिराच्या संदर्भात दिलेला निकाल असो, हे अंतिमतः मोदी सरकारच्या बाजूने दिलेले निकाल होते...
- न्या. बी.एच. लोया यांच्या संशयास्पद मृत्यूची चौकशी करण्याच्या संदर्भात, जी याचिका दाखल करण्यात आलेली होती, ती फेटाळणाऱ्या बेंचचे सदस्य चंद्रचूड होते...
- आपल्या सहकाऱ्याच्या संशयास्पद मृत्यूची चौकशी करावी असे चंद्रचूड यांना वाटले नाही...
- मुख्य आरोपी असलेले अमित शहा यांना दुखावण्याची, त्यांची तयारी नव्हती...
- चंद्रचूड यांनी, न्या. लोयांच्या संदर्भात, जो ११४ पानी निकाल दिला होता, तोदेखील आश्चर्यकारक असा होता...
- दुष्यंत दवे यांनी, ११ साक्षीदारांची उलट तपासणी घेण्याची केलेली विनंती, चंद्रचूड यांनी फेटाळलेली होती...
- न्या. खानविलकर व न्या. चंद्रचूड हे दोघेही महाराष्ट्रातील असल्यामुळे, या दोघांनी बेंचवर राहू नये, असे प्रशांत भूषण यांनीही सुचवले होते...
- तरीही खानविलकर व चंद्रचूड या दोघांनी, या केसमधून बाहेर पडण्यास नकार दिला...
- रामजन्मभूमीसंदर्भात निकाल देताना, ते देवासमोर हात जोडून बसले होते, असे त्यांनी नुकतेच जाहीर केलेले आहे...
- भाजपशी संधान असलेल्या न्यायमूर्ती, बेला त्रिवेदी या इतर अनेक न्यायाधीशांपेक्षा कनिष्ठ आहेत, तरीही सरन्यायाधीश असलेल्या चंद्रचूड यांनी, अनेक महत्त्वाच्या राजकीय केसेस बेला त्रिवेदींना मुद्दाम दिल्या...
- याच बेला त्रिवेदी यांनी, अनेक निकाल सरकारच्या बाजूने दिलेले आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. अनेकांचे जामीन अर्ज त्यांनी फेटाळले आहेत...
- धनंजय चंद्रचूड यांचे वडील, यशवंत चंद्रचूड हेदेखील जवळपास सात वर्षे सरन्यायाधीश होते...
- धनंजय चंद्रचूड हे, ३७ वर्षांचे असतानाच, त्यांना मुंबई हायकोर्टात न्यायाधीशपदी बसवण्याचे, यशवंतराव चंद्रचूड यांचे प्रयत्न सुरु होते...
- मुंबई हायकोर्टाचे ज्येष्ठ वकील म्हणून, चंद्रचूड यांना दर्जाही लवकर मिळाला होता...
- नंतर अटलबिहारी वाजपेयी सरकारने, त्यांची डिशनल सॉलिसिटर जनरल या पदावर नेमणूक केली...
- वयाच्या चाळीशीमध्येच त्यांची, न्यायाधीशपदी नेमणूक करण्याची शिफारस करण्यात आली होती. परंतु, भारताचे तत्कालीन राष्ट्रपती के.आर. नारायणन् यांनी आक्षेप घेतला होता...
- परंतु त्यांचे वडील न्या. यशवंत चंद्रचूड यांचे मित्र असलेले कायदामंत्री राम जेठमलानी यांनी, धनंजय चंद्रचूड यांच्या न्यायाधीशपदी नियुक्तीसाठी, बराच आग्रह धरला. स्वतः यशवंतराव चंद्रचूड यांनी, दिल्लीमध्ये सतत दहा दिवस यासाठी मोहीम केलेली होती...
- आणि, अगदी कमी वयात मार्च-२०००मध्ये, धनंजय चंद्रचूड हे, हायकोर्टाचे जज बनले. न्या. शरद बोबडे ‍व न्या. खानविलकर यांचीही नेमणूक झाली. अगोदर कुणी रुजू व्हावं यावरुनही तणाव निर्माण झाले होते...
- २०१३मध्ये अलाहाबाद हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश म्हणून, धनंजय चंद्रचूड यांची नियुक्ती झाली...
- वरीष्ठ वकील दुष्यंत दवे व न्या. चंद्रचूड यांच्यात सुनावणीदरम्यान बराच वादही झालेला होता...
- ज्ञानव्यापी मशीद, जजेसच्या नेमणूका, सहकारी जजेसना द्यावयाच्या केसेस, खंडपीठाची स्थापना इ. इ. संदर्भातही चंद्रचूडांची भूमिका ‍व व्यवहार बरोबर नव्हता...
- जजेसच्या नेमणूकीसंदर्भात शिफारस करतानाही, सरकारप्रती चंद्रचूड सॉफ्ट असायचे. 'सरकार नही मानेगी' असं म्हणायचे...
- व्हिक्टोरिया गौरी या भाजपच्या मेंबर होत्या आणि त्या न्यायमूर्ती झाल्या. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती के.एम. जोसेफ यांनी, यासंदर्भात नाराजी व्यक्त केली होती...
- चंद्रचुडांच्या अनियमिततेच्या विरोधात कपिल सिब्बल व दुष्यंत दवे यांनी जाहीरपणे आक्षेप घेतलेला होता...
- आणखी बरेच ताशेरे, या २५ पानी कव्हरस्टोरीमध्ये सौरवदास यांनी, धनंजय चंद्रचूड यांच्यावर ओढलेत...
- पोलखोल करणारी ही कव्हरस्टोरी संपूर्ण वाचावी अशी आहे...

(THE CARVA : NOVEMBER 2024: Cover Story by SURV DS)

## ''धार्मिक महोत्सव, खेळ महोत्सव आणि 'जनतेचं' विसर्जन''

ही भीषण अवस्था, यापूर्वीही महाराष्ट्रात १६ एप्रिल-२०२३ रोजीच्या खारघरच्या सेंट्रल-पार्कमधील बैठक-संप्रदायाचे सर्वेसर्वा, नाना धर्माधिकारी यांच्या कार्यक्रमात दिसली...तिथे डझनावारी भोळ्याभाबड्या जीवांचे प्राण, निव्वळ बड्या राजकारण्यांच्या सोयीसाठी आयोजन केल्या गेलेल्या तेथील ऐन रणरणत्या उन्हातील निर्मम अव्यवस्थेमुळे तडफडून गेले होते. तसेच, २०२५ मधील प्रयागराज (उत्तर प्रदेश) महाकुंभ-मेळ्यातील चेंगराचेंगरीत तर दोन हजारांहून अधिक बळी गेले होते. तरीही, सामान्य जनता अशी का वागते, हे उलगडत नाही. हा कुठला नाद, ही कुठली नशा...ज्यावर, हे सामान्य जीव जगू पहातात? ''जगणं जेवढं जेवढं म्हणून अधिकाधिक कठीण होत जातं; तेवढी तेवढी अशा कृत्रिम नशांची सामान्य माणसाला साधं तगून रहाण्यासाठी आवश्यकता भासू लागते''...त्या नशेला आपल्या जगण्याचा कृत्रिम आधार बनवून आपलं अवघं जगणंच ही माणसं पिढ्यानपिढ्या नासवून घेत रहातात. या संप्रदायी-धार्मिक वा खेळ-महोत्सवी नशेमध्ये चूर्र राहिल्यामुळे आपल्या आयुष्यात बदल घडवून कायमचं सुखीसमाधानी-सन्मानपूर्वक जगण्यासाठी...रक्तपिपासू-निर्मम-शोषक भांडवली-व्यवस्थेला (Vampire-State System) आव्हान देण्याचं, संघर्ष करण्याचं भान ते हरवून बसतात आणि भांडवली-व्यवस्थेला तर नेमकं तेच हवं असतं; त्यासाठीच, या सगळ्याचं प्रयोजन असतं! सामान्य जनता अशातऱ्हेनं ढ्ढ्ढ आणि थंडफ बनल्यानेच भांडवलदारवर्गाला जनतेच्या लुटलेल्या संपत्तीचा व गुन्हेगारी-संगनमताने मिळवलेल्या पाशवी सत्तेचा निर्वेध-अनिर्बंध उपभोग घेता येतो.

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

'ट्रिपल-इंजिन'वाल्या सरकारच्या 'त्रैभाषिक' (ट्रिपल-लँग्वेज) धोरणानुसार पहिल्या इयत्तेपासून महाराष्ट्रात शिकवली जाणार; एवढ्यापुरतचं, सध्याच्या 'बीजेपी'ने सडवलेल्या भारतीय राजकारणात 'हिंदी'चं अप्रूप नव्हे...तर, ''भारत-पाकमध्ये मीच मध्यस्थी केली'', असं एकूण चौदा वेळा जाहीरपणे सांगून आपली चांगलीच 'गोची' करणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांना; त्यांना न कळणाऱ्या 'हिंदी' भाषेतच, ''कुणा त्रयस्थाची मध्यस्थी स्विकारणार नाही'', असं मोदी सुनावतात... ''नरेंदर सरेंडर'' या ''आपल्यावरच्या कडव्या टिकेचा साप भी मरे और ट्रम्प-दोस्ती की लाठी भी न टूटे'', असा हा 'विश्वामित्री पवित्रा' म्हणायचा...है ना बात पते की!

...पण, गोलमाल 'ऑपरेशन-सिंदूर'बाबत मात्र, हिंदी-गायपट्ट्यातल्या बिहारी प्रचारसभेत चक्क टेलिप्रॉम्प्टरवरच्या खणखणीत इंग्रजीतून जगाला मोदी थेट इशारा देतात...आपल्या गलिच्छ, हिणकस, देशविघातक स्वार्थी राजकारणासाठी 'हिंदी, हिंदुत्व किंवा हिंदुराष्ट्रा'चा कसा कधि बेमालूम वापर करायचा, ते 'बीजेपी'वालेच जाणो!

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# वसंतराव पाटील आणि संजय सूर्यवंशी...कामगार-धर्म जोपासणारे 'LG हिंग' कंपनीतील 'धर्मराज्य'चे सच्चे गुणवंत कामगार...!!!



दुर्दैवाने, अगदी अभावानेच नितीमत्ता व 'कामगारधर्म', हल्लीच्या कामगारांमध्येच उरलेला असल्याने, गेल्या काही वर्षांपासून भारतातील कामगार-चळवळीला अवकळा आलेली आहे. कंत्राटी-पद्धतीतील गुलामगिरी व नव-अस्पृश्यतेद्वारे त्यांचं भांडवली-व्यवस्थेकरवी अमानुष शोषण सुरु आहे...अशा या संपूर्ण प्रतिकूल परिस्थितीत, गेल्या तीन दशकांहून अधिक काळ 'राजन राजे' नावाच्या पंचाक्षरी मंत्राने, आपल्या ज्वलंत आणि जाज्वल्य नेतृत्वाच्या जोरावर, कामगार-जगतात 'अवघा हलकल्लोळ' करीत कामगारांमध्ये नितीमत्तेसह ज्वलंत 'कामगार-धर्म' जागृत केलाय. भारतातील पहिलावहिला पर्यावरणवादी हरित-पक्ष, अशी ओळख असणाऱ्या 'धर्मराज्य पक्षा'च्या अंतर्गत 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ' या युनियनची स्थापना करुन त्यांनी कंत्राटी-कामगार पद्धतीविरोधात 'धर्मयुद्ध' पुकारले!

**...ज्या ज्या कंपन्यांमध्ये राजन राजेंची 'धर्मराज्य' युनियन आहे, त्यातील एकाही कंपनीमध्ये कंत्राटी-कामगार पद्धतीला थारा दिला गेलेला नाही. सुरक्षित नोकरीसह सन्मानजनक लाखाच्या घरात वेतन आणि किमान तेवढा 'सहा आकडी' दिवाळी बोनस देण्याचं क्रांतिकार्य, राजन राजे नावाच्या कामगार-हृदयसम्राटाच्या हातून जागोजागी घडतंय व असंच पुढे घडत राहील.**

जसा राजा, तशी प्रजा या उक्तिनुसार, कामगार-नेता जेवढा प्रामाणिक व कर्तृत्ववान, तेवढाच कामगार सजग आणि नीतिमान...आणि, याचे अगदी ठळक उदाहरण म्हणजे, राजन राजे यांच्या नेतृत्वाखालील 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ' या युनियनचे, मुंबई-अंधेरीस्थित 'लालजी गोधू अँड कंपनी' (L.G. हिंग) या कंपनीतील श्री. वसंतराव पाटील आणि श्री. संजय सूर्यवंशी, या दोघा कामगार सदस्यांचे देता येईल. **आपल्या प्रदीर्घ सेवेअंति निवृत्त होताना, 'धर्मराज्य'च्या या दोन शिलेदारांनी, प्रत्येकी रु. ५० हजारांची भरघोस देणगी, धनादेशाद्वारे 'धर्मराज्य-संघटने'ला देऊ केलीय, ही लोकविलक्षण घटना आहे. ज्या नेत्याने आपले घर उभारले, आपल्या जगण्यात समृद्धी आणली, आपल्याला सामाजिक प्रतिष्ठा देऊन ताठ मानेनं जगण्यास शिकवलं...त्या नेत्याप्रती व संघटनेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा त्यांचा हा औदार्यपूर्ण प्रयास, नक्कीच अभिमानास्पद व अनुकरणीय होय.**

खऱ्याअर्थाने, आधुनिक अर्थव्यवस्थेत कामगार हाच राष्ट्रीय-संपत्तीचा प्रमुख निर्माता असूनही...त्याच्यावरील अन्याय-अत्याचार व शोषणाविरुद्ध दाद मागण्यासाठी कामगार-संघटना चालविणे म्हणजे, आर्थिकदृष्ट्या कर्मकठीण होऊन बसलेले असताना, श्री. वसंतराव पाटील आणि श्री. संजय सूर्यवंशी या दोघांनी दाखविलेले आपले 'कर्मयोगी-दायित्व', संघटनेला बळकटी देऊन जाईल व त्याचा इतर अनेक कंपनीतील कामगारांना व कामगार-चळवळीला मोठा हातभार लावून जाईल!

**...असे नीतिमान, उदार व कृतज्ञ कामगार, इतर कुठल्याही युनियनच्या नशिबात असण्याची शक्यता, तशी दुरापास्तच! हा चमत्कार, राजन राजे यांनी कामगारक्षेत्रात नवचैतन्य ओतून, 'कामगारद्रोही भांडवली-व्यवस्थे'ला दिलेल्या आव्हानाचाच जणू परिपाक आहे...भाजप-संघीय केंद्र सरकारच्या टोकाच्या 'कामगारघातकी' धोरणांच्या पार्श्वभूमीवर तर, प्रस्थापित शोषक-लुटारु भांडवली-व्यवस्थेविरोधात पुकारलेला हा 'एल्गार' आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही!**

# झुंजार अत्रे. . . गांधीजींची वाहवा!

२८ सप्टेंबर १९४१ रोजी अत्रे पुण्याच्या स.प. महाविद्यालयाच्या नियतकालिकाच्या महोत्सवी समारंभाचे अध्यक्ष म्हणून पुण्यास गेले होते. तो रविवार असल्यामुळे महाविद्यालयातील वर्ग, प्रयोगशाळा, प्राध्यापकांच्या विश्रांतीसाठी राखून ठेवलेली खोली, या सर्वांना टाळी ठोकण्यात आली होती.

अत्र्यांचं भाषण दुपारी रमाबाई सभागृहात आयोजित करण्यात आलं होतं. सभेच्या ठिकाणी हिंदुत्वनिष्ठ विद्यार्थी त्यांच्यावर हल्ला करणार असल्याचं, हिंदुमहासभेचे पुढारी गणपतराव नलावडे यांनी, त्यांना सकाळीच सांगितलं होतं. ७ व १४ सप्टेंबर १९४१ च्या 'नवयुग'च्या अंकात 'मूठभर ब्राह्मणांचे पुढारी सावरकर' आणि 'स्वातंत्र्यवीर का स्वातंत्र्याचे शत्रू' हे मथळे देऊन अत्र्यांनी दोन अग्रलेख प्रसिद्ध केले होते. त्यामुळे सावरकरभक्त विद्यार्थी संतप्त झाले होते.

रमाबाई सभागृहात व्याख्यान देण्यासाठी अत्रे उभे राहताच शे-दिडशे विद्यार्थ्यांच्या झुंडीने अत्र्यांना वेढलं आणि रेटारेटी करुन त्यांना खाली पाडण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. दाभणाचे टोचे, टोमॅटो, मिरचीची पूड यांचा वापर तर केला गेलाच, शिवाय सोडावॉटरच्या बाटल्यांचे तडाखे त्यांच्या डोक्यावर हाणण्यात आले. गालावर रक्ताचा ओघळ वाहत होता. तेव्हा अत्रे काँग्रेसमध्ये होते. दंगलखोरांनी त्यांच्या डोक्यावरची टोपी काढून फेकली. चष्मा फोडला. अंगावरचा खादीचा कोट फाडला. कोटाच्या खिशातले चारपाचशे रुपये होते, ते ही काढून घेतले.


'सावरकरांची माफी मागा' अशी घोषणा देणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्र्यांनी प्राण गेला तरी नाही, नाही, नाही...असं ठामपणे उत्तर दिलं. छातीवर हात ठेऊन आणि शांत व ताठ उभे राहून अत्र्यांनी बेडरपणे हल्लेखोरांचा हल्ला सोसला. गालावर रक्ताचा ओहळ वाहत होता. लहानसहान स्वरुपाच्या ८४ जखमा त्यांना करण्यात आल्या होत्या. शरीराची अशी अवस्था हल्लेखोरांनी केली असताना, अत्र्यांनी निर्भयपणे 'मराठी वाङ्मय' या विषयावर तास-दीड तास व्याख्यान दिलं. ५ ऑक्टोबर १९४१ च्या 'नवयुग'मध्ये 'मला मारणारे मेले, मी जिवंत आहे', हा त्यांचा अग्रलेख प्रसिद्ध झाला.

याविषयी गांधीजींनी अत्र्यांना अगत्याने लिहिलेल्या पत्रात म्हटलं होतं, ''दिडशे गुंडांना अहिंसक वृत्तीने तोंड देऊन आचार्य अत्रे सहीसलामत बाहेर पडले, याचा अर्थ हा अहिंसेचा विजय आहे!''

*...सुनील कर्णिक*

- य. दि. फडके, 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र', खंड ८, पानं १९४ - ५. मौज प्रकाशन, २००८.

# अत्रे, आंबेडकर आणि वंचित....



६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं दिल्लीत पहाटे महापरिनिर्वाण झाल्याचं वृत्त येताच, शोकाकुल अंत:करणाने दुसऱ्या दिवशीचा 'मराठा'चा सगळा अंक अत्र्यांनी एकट्याने लिहिला.

बाबासाहेबांच्या पार्थिवावर दादर चौपाटीवर अंत्यसंस्कार केले जात असताना, त्यांना श्रद्धांजली वाहण्याचं काम एकट्या अत्र्यांकडे सोपवण्यात आलं होतं. लाखो लोकांसमोर शोकमग्न स्वरात केलेल्या भाषणाबद्दल अत्र्यांनी आत्मचरित्राच्या पाचव्या खंडात लिहिलं आहे, ''मी आयुष्यात इतकी भाषणं केली असतील; पण, या भाषणादरम्यान मला फार मोठ्या अग्निदिव्यातून जावं लागलं. माझ्या प्रत्येक वाक्यावाक्याला हजारो स्त्रीपुरुष अक्षरश: धाय मोकलून रडत होते...त्यामुळे मला बोलणंही अशक्य झालं होतं.''

लाखो लोकांच्या मनातील भक्तिभावाचा मेळ, अत्र्यांच्या अंत:करणातील भक्तिभावाशी जुळला की, अत्र्यांच्या वाणीला व लेखणीला एकच उधाण येत असे. सामान्य माणसांच्या मनात राज्यकर्त्यांनी केलेल्या अन्यायामुळे आणि अत्याचारांमुळे असंतोष खदखदत असेल तर, त्याचा स्फोट अत्र्यांच्या भाषणातून व लेखातून होत असे.

*...सुनील कर्णिक*

# महाराष्ट्र-धर्माची चाड असेल तर, सापळ्यात न अडकता नीट वाचा आणि विचार करा...

...पृष्ठ क्र. १ वरुन

देशाला मार्ग दाखवला. फुले दाम्पत्य, राजर्षी शाहू महाराज, महर्षी शिंदे, गाडगेबाबा, रं.धो. कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, ही प्रबोधनाची, समाजसुधारणेची मोठी परंपरा राहिलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर एवढंच नाव पुरेसं आहे, ज्यांनी महाराष्ट्राला, देशाला आणि जगाला भरभरून दिलेलं आहे. काँग्रेसची स्थापना इथेच झाली आणि गांधीजींची कर्मभूमी महाराष्ट्र राहिला...

**सहकाराची जननी असलेला महाराष्ट्र, रोजगार हमी योजना, ग्राम स्वच्छता अभियान यासारख्या अभिनव प्रयोगांची जननी आहे. सामाजिक संस्था, सार्वजनिक वाचनालय, व्याख्यानमाला या सगळ्याच गोष्टी इतक्या विपुल प्रमाणात आहेत. शिवाय, यांच्यात असणारी विविधता दखल घेण्याजोगी आहे. महाराष्ट्रासाठी आंदोलन उभं करण्याची वेळ आली; तर, संयुक्त महाराष्ट्र चळवळीने तेही दाखवून दिलेलं आहे. महाराष्ट्रातील औद्योगिक, शैक्षणिक प्रगती, शिक्षणाचा दर्जा अजूनही भारतात चांगला आहे. महाराष्ट्रातली ही साधनसंपत्ती, मोजक्या उद्योगांच्या माध्यमातून आपल्या खिशात घालण्यासाठी लोकांचा अडथळा उभा राहू शकतो.** वीज मंडळ, एसटी, आरोग्यसेवा, शिक्षणव्यवस्था या सगळ्यांच्या मालकीच्या जमिनी लाखो-कोटींच्या आहेत, ज्यामधून पैसे मिळवून, तेच पैसे पुन्हा सत्ता मिळवायला आणि टिकवायला वापरायचे आहेत. गडचिरोलीसारख्या जंगलातून खनिजांचे उत्खनन करायचे आहे. दक्षिणेतील राज्यात, राजकीय सत्ता मिळवायला आणि त्यानंतर सामाजिक समरसतेच्या नावाने, सांस्कृतिक बुलडोझर फिरवून, सगळी एकसाची प्रतिमा निर्माण करण्यासाठी जी धडपड सुरु आहे, तिच्यामध्ये सगळ्यात मोठा अडथळा महाराष्ट्राचा आहे!

**ही अनिर्बंध लूट, विनासायास कुठलाही विरोध न करता करायची असेल; तर, महाराष्ट्राचे सत्व आणि स्वत्व हिरावून घेण्याशिवाय पर्याय नाही. अधिवेशनात, हा नवा कायदा मंजूर करुन घेण्याचा आटापिटा त्याचसाठी आहे. जगात जोपर्यंत शोषक आणि शोषित हे दोन वर्ग अस्तित्वात असतील, तोपर्यंत साम्यवाद आणि डावा विचार अस्तित्वात असेल. तुम्ही कुठल्याही 'इझम'ने प्रेरित असला तरीही, तुम्ही भारतीय घटनेच्या चौकटीत असाल तर, कुणाला आक्षेप असण्याच कारण नाहीये...** मग, सरकारला प्रश्न विचारणारे सरसकट सगळे अर्बन-नक्षल कसे? गाजावाजा करुन आणलेली भारतीय न्यायसंहिता परिपूर्ण आहे, असं गल्ली ते दिल्ली सगळेच म्हणालेले आहेत; मग, राज्यातल्या लोकांना धडा शिकवायला नवा कायदा कशाला हवा? आहे हेच कायदे राबवायला पोलीस खाते सक्षम आहे ना?

नव्या कायद्याची गरज भारतीय न्यायसंहिता कुचकामी असल्याचं सांगत आहे का... की, नव्या कायद्याचा उद्देशच वेगळा आहे? अनिर्बंध अधिकारांची गरज आहे म्हणून, नवीन कायदा आणला जातोय का? एकदा कायदा मंजूर झाला की, सरकारला प्रश्न विचारणारा, सरकारच्या विरोधात बोलणारा प्रत्येक माणूस, अर्बन-नक्षल ठरवण्याची ताकद आणि अधिकार सरकारला मिळतील. कुठल्याही आंदोलनात लोक एकत्र व्हायला लागले आणि या कायद्याने पाच-पन्नास लोकांना अटक होऊन जामिनासाठी झगडावे लागले की, आपोआप बाकीचे ठिकाणावर येतील. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या जमिनी, शहरातल्या, गावातल्या सरकारी जमिनी, नैसर्गिक साधनसंपत्ती सगळं लुबाडून घेऊन, त्याच पैशाच्या जोरावर सत्ता टिकवून, दक्षिणेत घुसण्यासाठी महाराष्ट्र मोडून काढलाच पाहिजे. हे सगळं षडयंत्र जर लक्षात येत असेल; तर, मग नेमका मुद्दा महत्वाचा कोणता आहे आणि कुठल्या मुद्द्यावर संघर्ष उभा राहिला पाहिजे हेही समजेल.... मराठी माणसांनो, महाराष्ट्रच सत्व, स्वत्व आणि सत्य धोक्यात आहे. महाराष्ट्र-धर्म धोक्यात आहे. जागे व्हा, विचार करा आणि कृती करा !!!

***....आनंद शितोळे***
महाराष्ट्रधर्म वाढवावा
आपल्या धडावर आपलेच डोके

## 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांचे मातृभाषेप्रती गौरवोद्गार...

...पृष्ठ क्र. १ वरुन

वतीने आपण सगळ्या अत्यंत उचित मागण्या मांडलेल्या आहेत. त्याला आमचा पूर्वी पाठिंबा होता, आजही आहे आणि यापुढेही राहील. आपला महत्त्वाचा मुद्दा भाषा संवर्धनाचा होता. भाषा संवर्धनाचा का? मराठी भाषेचं संवर्धन करायचं आणि कसं करायचं असे दोन मुद्दे होते. मला इथे सांगायला अभिमान वाटतोय, मराठी भाषा ही, आजच्या जागतिक-तापमानवाढीच्या पर्यावरणीय महासंकटाच्या काळात, एकमेव अशी निसर्ग आणि पर्यावर-स्नेही अशी भाषा आहे. कारण, याच भाषेत आपण वृक्षवल्ली आम्हा सोयरी, वनचरे असं म्हणतो. आपले सणदेखील प्राणी, वनस्पती यांच्याशीच निगडीत आहेत. मग ती नागपंचमी असेल, बैलपोळा असेल, तुळशी-विवाह असेल, वटपौर्णिमा असेल... मला नाही वाटत, असे नैसर्गिक संस्कार इतर कुठल्या संस्कृतीत असतील, त्यामुळे मराठी भाषेच्या सक्तीसोबतच, आता तिची 'भक्ती' होण्याची खरी गरज आहे. जगभरात तिची दखल घेतली गेली पाहिजे, असे गौरवोद्गार राजन राजे यांनी उपस्थितांशी संवाद साधताना काढले.

दरम्यान, आपल्या ओघवत्या शैलीत 'धर्मराज्य पक्षा'ची भूमिका अधिक ठळकपणे विषद करताना, राजन राजे पुढे म्हणाले, मराठी भाषेवर वेगवेगळ्या भाषांचे आक्रमण होतंय, संक्रमण होतंय... ते, का आणि कशासाठी होतंय हे आपल्याला हे समजून घेणं गरजेचं आहे. मुलांवरील अभ्यासाचं दडपण आपण कमी केलं पाहिजे, गणित आणि विज्ञान हे विषय अत्यंत गुंतागुंतीचे होत चाललेत. त्यातच रेशीम बागेतून आमचा इतिहासदेखील गुंतागुंतीचा केला जातोय. खोटेपणा घुसडून इतिहास तर बदललाच; पण, भूगोलही बदलला. फक्त त्यात गलवान खोऱ्यातला आमचा चार हजार किलोमीटरचा प्रदेश, चीनला दान देऊन एवढा सगळा गुंता वाढलेला असतानाच, त्यातच आणखी तिसऱ्या भाषेचं दडपण, आमच्या मुलांच्या बालमनावर बिलकुल येता कामा नये. हिंदीचं शिक्षण घ्यायचं असेल; तर, काळजी करायची गरज नाही, सक्ती तर अजिबात करायची नाही... कारण, त्याची काळजी बॉलिवूड घेत आहे. मुलं आपसूकच हिंदी शिकतील ना, त्यासाठी शाळेतून सक्ती कशाला? शिवाय करोडो उत्तर भारतीय आहेतच, अशा उपरोधिकपणे त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मराठी भाषेचं बाजारपेठेतील महत्त्व घसरत चाललंय... पण, आपल्याला ही बाजारपेठेतील किंमत कशी वाढेल हे पाहणं अत्यंत गरजेचं असून, त्यासाठी भांडवली व्यवस्थेला हादरे द्यावे लागतील. हा प्रश्न फक्त हिंदीभाषिक म्हणून उत्तर-भारतीयांपुरता नाहीये; तर, गुजराती आणि मारवाडी यांच्या भांडवली-व्यवस्थेला हादरा देण्याचा सुद्धा आहे आणि म्हणूनच, अनेक गोष्टींसोबत कंत्राटी-कामगारपद्धतीचं उच्चाटन हे प्रामुख्याने व्हायला पाहिजे. देशापेक्षा महाराष्ट्रासामोर हाच सगळ्यात मोठा प्रश्न आहे. या भांडवली व्यवस्थेला हादरे दिलेत, तरच तुमची मराठी भाषा आणि मराठी माणूस सुरक्षित राहील, नाहीतर त्याचं महाराष्ट्रातून उच्चाटन होईल. अनेक आंदोलनं करताना, पर्यावरणीय महासंकटाच्या संदर्भात आम्हाला सांगितलं जातं की, कोण कुठे जन्माला येतो हा अपघात असतो. कोण कोकणात जन्माला येतो तर, कोण आणखी कुठे जन्माला येतो; मग, आमच्या सगळ्यांचा महाराष्ट्रातला जन्मसुद्धा एकदाचा अपघातठरवाआणिआम्हालाअरबीसमुद्रातढकला...नाहीतरी, आमच्या महापुरुषांचा पुतळा तुम्ही अरबी समुद्रात उभारलेला आहेच. आपल्याला पुढे भविष्यात 'एक दुकान-एक मकान' अशापद्धतीने पुढे जावे लागेल, तरच आणि तरच महाराष्ट्रात मराठी माणसाचा बोलबाला होईल, मराठी भाषेला पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त होईल. गुजराथी माणसं हिंदी बोलतात, गुजराथी माणसं इंग्लिश बोलायला लागले तरी, गुजरातचे महत्त्व कमी होणार नाही... कारण, भारताची संपूर्ण अर्थव्यवस्था त्यांच्या ताब्यात आहे. आम्ही पाचवीपासून इंग्लिश शिकलो. पण, उत्तम इंग्लिश बोलू शकतो, भाषण करू शकतो, उत्तम लिखाण करू शकतो. थोडं इकडे तिकडे होईल, काही फरक पडत नाही. त्यामुळे आपण जी सगळी धोरणं घेतलेली आहेत, ती अनुपम आहेत, योग्य आहेत आणि त्याला आमचा सदैव पाठिंबा राहील, हे या व्यासपीठावरून आम्ही जाहीर करतो, अशा शब्दांत राजन राजे यांनी, आपले मनोगत व्यक्त करुन, भविष्यातील मराठी भाषेच्या आणि महाराष्ट्रधर्माच्या रक्षणासाठी तत्पर असल्याचे स्पष्टपणे अधोरेखित केले.

# कुठल्याही कंपनीतील कामगार-कर्मचाऱ्यांनी मुद्दामहून वाचावं, असं काही....

१८ जून-२०२५ रविवारचा तो पावसाळी दिवस आणि त्या एकाच दिवशी समस्त कामगारवर्गासाठी अतिशय उद्बोधक, असे दोन कार्यक्रम घडून गेले...आणि, ते होते, एकाच कंपनीतल्या दोन निवृत्त कामगारांच्या संबंधाने...कंपनीचं नाव सुल्झर पंप्स्, दिघा (नवी मुंबई) आणि कामगारांची नावं अनुक्रमे प्रफुल्ल मुणगेकर व काशिनाथ वडगावकर.

**प्रफुल्ल मुणगेकरचा कंपनीतल्या कामगारांनी आयोजित केलेला निवृत्ती-समारंभ सकाळी होता; तर, काशिनाथ वडगावकर, या दोन वर्षांपूर्वीच निवृत्त झालेल्या गुणी कामगाराचा कौटुंबिक स्वरुपाचा ‘षष्ट्यब्दी’ सोहळा (साठावा वाढदिवस)... त्याच्या ‘वर्षा’ नावाच्या आयटी-उद्योगात अधिकारी असणाऱ्या उच्चशिक्षित पुतणीने खास आयोजित केला होता (त्याचं कारणही तसं खास होतं).**

प्रफुल्ल मुणगेकर हा कामगार जेमतेम १८ वर्षांच्या सेवेनंतर सुल्झरमधून निवृत्त होत असताना (त्याची पूर्वीची कंपनी बंद पडल्याने, सुल्झरमध्ये काम करणाऱ्या त्याच्या भावाने त्याला तिथे ‘हेल्पर’ म्हणून लावण्याची व्यवस्था केली होती), त्याचा पगार तब्बल रु. ८५ हजार होता...खरंतं पाच वर्षांपूर्वी आलेल्या नव्या ‘कामगारविरोधी’ सुल्झर व्यवस्थापनाने, जुना करार मोडून संघटनेच्या निष्ठावान कामगारांवर घोर अन्याय केल्यामुळे... जो पगार लाखाच्याही वर असायला हवा होता, तो ८५ हजाराच्या भोज्यावर थबकला होता, हे विशेष (ज्याविरोधात, कामगार संघटनेने न्यायालयात दाद मागितलेली आहेच)!

**...सांगा, ‘राजन राजे’ या पंचाक्षरी चमत्कारापलिकडे (केवळ, सुल्झरचं नव्हे; तर, ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’च्या याच नेतृत्त्वाखालील अनेक कंपन्यांमध्ये थोड्याफार फरकाने असेच घसघशीत पगार / बोनस आहेत), साध्या ‘हेल्पर’ला कुठे असे पगार व लाखाचे बोनस, तेही फक्त १८ वर्षांच्या सेवेपश्चात असू शकतात?**




काशिनाथ वडगावकरच्या रात्रीच्या षष्ट्यब्दी सोहळ्यात भिजलेल्या डोळ्यांनी, त्या कार्यक्रमाचं अप्रूप कथन करताना वर्षानं (पुतणीनं) सांगितलं की, ‘‘माझे वडील लहानपणीच वारल्यानंतर आम्ही सारे उघड्यावर पडलो होतो... तेव्हा, आमचा काका (काशिनाथ), ज्याला आम्ही ‘आबा’ म्हणतो, तो पुढे आला आणि त्याने आपली मुलगी व मी पुतणी, यात जराही भेदभाव न करता, दरमहा भरीव आर्थिक मदत करुन आमच्या पालनपोषणाची व शिक्षणाची मोठी जबाबदारी पार पाडली...म्हणूनच मी शिकून आज आयटी-उद्योगात अधिकारीपदावर काम करताना तुम्हाला दिसतेय...‘आबा’ या शब्दात माझी ‘आई’ ही आहे आणि माझे ‘बाबा’ देखील आहेत...म्हणून तो माझा ‘आबा!’

...तो साराच प्रसंग अतिशय भावपूर्ण व हेलावून टाकणारा जरुर होता; पण, पुतणी वर्षा एक गोष्ट मात्र सांगायची विसरलीच की, तिचा ‘आबा’ म्हणजे आमचा ‘काशिनाथ’... हे जे काही महान कौटुंबिक-कार्य करत राहिला; ती आमच्या ‘सेऊ’ (SEU...सुल्झर पंप्स इंडिया एम्प्लॉईज युनियन), या कामगार-संघटनेची मूलभूत व आधारभूत संस्कृतीच होती व आहे...आणि, त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे, जो काही भरभक्कम पगार / बोनस ‘सेऊ’ संघटनेमुळे कामगार-कर्मचारीवर्गाला मिळत होता...त्यामुळेच, दोन दोन संसार सावरुन धरणं, काशिनाथसारख्या कामगाराला शक्य झालं. मुळातून काशिनाथच्या या गुणवैशिष्ट्याचं व सहृदयतेचं भरभरुन कौतुक जरुर आहेच...पण, **ज्यापद्धतीने गेल्या पाच वर्षांत ‘सुल्झर पंप्स्’च्या नव्या व्यवस्थापनाने, जबरदस्तीने ‘‘कंत्राटी-कामगार पद्धत’ लादण्यासाठी...नीच-अधम वृत्तीच्या आत्यंतिक स्वार्थी, गद्दार कामगारांच्या फुटीर गटाला हाताशी धरुन...जो आजवर भयंकर उत्पात कंपनीत माजवलाय आणि सगळ्या संकटांना धैर्याने तोंड देत ‘कामगारधर्म’ जोपासणाऱ्या निष्ठावान कामगार-कर्मचारीवर्गाची, जी भयानक ससेहोलपट केलीय... त्यातून, पुन्हा असे नवे ‘आबा’ तयार होणं यापुढे शक्य नाही!** उलट, अशा कंत्राटी ‘आबां’ना जेव्हा जेव्हा नोकरीतून काढलं जाईल...तेव्हा तेव्हा, त्यांना व त्यांच्या दरिद्री संसाराला आधार देणारे हात शोधावे लागतील...त्यांच्या ‘बायडी’ला रिक्षा चालवावी लागेल, नाहीतर कुठलीशी कुडमुडी नोकरी शोधावी लागेल...अन्यथा, शासनाची ‘लाडकी (?) बहिण’ म्हणून खात्यात पडणाऱ्या दिडदमडीच्या रकमेकडे चातकाच्या नजरेनं पहात रहावं लागेल!

...पुन्हा असे नवे ‘आबा’ तयार होणं, यासाठी थांबेल; कारण, तुटपुंज्या पगाराच्या ‘कंत्राटी-कामगार’ नावाच्या नव्या ‘आबा’ला, आपल्या स्वतःच्या फाटक्या संसाराची गोधडी शिवता येणे नाही...तिथे तो कंत्राटी-गुलामीत राबणारा व कौटुंबिक प्रेम जपणारा ‘आबा’, आपल्यासोबत मृत भावाच्या संसाराचा गाडा, मनातून कितीही इच्छा असली; तरी कसा काय हाकू शकेल?

**‘‘कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ’’, या उक्तिनुसार व्यवस्थापनाने दाखवलेल्या आमिषाला अथवा व्यवस्थापकीय धाकदपटशाला** (Corporate-Terrorism) **बळी पडून ‘‘कामगारच कामगारांचा शत्रू वा काळ बनला’’ की, वेगळं काय घडणार? ज्या कंपनीच्या लोकविलक्षण कार्य-संस्कृतीचा देशभर व देशाबाहेरही बोलबाला होता व जी ‘कार्यसंस्कृती’ इतर कंपन्यांमधील कामगार-चळवळीसाठीही ‘दीपस्तंभा’सारखी काम करत होती; तिच्या अगदी पाऊलखुणा देखील भाडोत्री ‘बाऊन्सर्स’ दिमतीला ठेऊन, पोलिस खातं-कामगार खातं आणि स्थानिक ‘मनगटशहा’ असलेले गुंडपुंड राजकारणी खिशात ठेऊन जोरजबरदस्तीने पुसल्या गेल्या...**ज्या कार्य-संस्कृतीवर प्रबंध लिहून ILO (International Labour Organisation) मध्ये पाठवले गेले, प्रत्यक्ष अनुभवल्याखेरीज ज्यावर विश्वास ठेवणं देखील कठीण; म्हणून अनेक कंपन्यांतील व्यवस्थापकीय-तज्ज्ञांनी (IIM/IIT मधील देखील) प्रत्यक्षात भेट देऊन तिचा अभ्यास केला...ती आज ‘मोहनजोदडो-हडप्पा’ संस्कृतीसारखी नष्टप्राय झालीय! जी कंपनी म्हणजे, हसतखेळतं ‘आनंदाचं गोकुळ’ होतं; त्याच कंपनीत आज स्मशानशांततेला लाजवणारा ‘सन्नाटा’ पसरलाय...कुणाकुणाचं मिळून हे महापातक???

**...ज्यांनी ज्यांनी, गद्दारीतून आपलं उखळ पांढरं करुन घेण्यासाठी अथवा आपली स्वतःची कातडी वाचविण्यासाठी, अशा ‘आबां’ची निर्मिती करणाऱ्या जैव-प्रक्रियेच्या गळ्याला नख लावलं...हसतखेळते संसार हकनाक उध्वस्त केले आणि त्यातून, विकृत आनंद मनसोक्त भोगले, त्यांना नियती माफ करणे नाही!**

**केल्या कर्माचे कर्मभोग ‘याचि देही, याचि डोळा’...या ना त्या मार्गाने, भोगावे हे लागणारच...त्यातून संबंधित, या सगळ्याच नीचात्म्यांची-पापात्म्यांची सुटका नाहीच!**

***...राजन राजे***

(संस्थापकीय अध्यक्ष : ‘सेऊ’...SEU आणि ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ’)

# रोहिणीच्या मृत्यूस जबाबदार कोण...???

इंजिनिअरिंगचं शिक्षण घेणाऱ्या रोहिणी निमसे या शहापूरच्या (मौजे-अल्यानी) १९ वर्षीय तरुणीचं घरी झोपेत मण्यार हा विषारी साप चावून शहापूरच्या उपजिल्हा इस्पितळात पुरेशा योग्य उपचाराअभावी (उदा. ICU Bed सह इतर वैद्यकिय-सुविधा व तज्ज्ञ डॉक्टरांचा अभाव) नुकतंच दुर्दैवी निधन झालं....



**मुरबाड-शहापूरसारख्या ग्रामीण भागात, जेथे समृद्धी महामार्ग, काळू-शाई धरणे, एमआयडीसी कारखाने, निवासी व व्यापारी संकुले आदि मोठमोठे हजारो कोटींचे प्रकल्प उभारले जात असताना...आजही तेथे सर्पदंशाने अथवा विंचू चावून मोठ्याप्रमाणावर जिवितहानी होत असेल; तर, या काँक्रिटच्या तथाकथित विकास-प्रकल्पांचं काय लोणचं घालायचं का, हा सवाल आहे. अशा महाकाय प्रकल्पांतून नेमकी कोणाची सोय साधली जातेय?**

येथील लाडक्या दिडहजारी बहिणींच्या खात्यात किती व कधि पैसे आले, याचे हिशोब जाहीर होतात; पण, त्यांच्या रक्तात हिमोग्लोबीनचं प्रमाण इतकं कमी का...त्यावर वर्षांनुवर्षे ना चर्चासत्र झडतं, ना मूलभूत उपाययोजना होत. तरीही, इथले तेच तेच लोकप्रतिनिधी देशभरात 'विक्रम' ठरावा, एवढ्या प्रचंड मताधिक्याने निवडून येत रहातात. आमच्या मुरबाड-शहापूरमध्ये धर्मसंप्रदायांना पद्धतशीर ऊत आणला जातो; पण, हे असे जगण्याच्या आसाला भिडलेले प्रश्न, ते का ऐरणीवर आणू शकत नाहीत...हा प्रश्न त्यांना विचारायचा नको? ...की, फक्त रस्त्यांवर व नाक्यानाक्यांवर आपल्या संप्रदायांच्या कमानी उभारणे, रस्त्यांची साफसफाई व वृक्षारोपण करणे...हीच, या निवेदन-निरुपण करणाऱ्या संप्रदायांची ('व्यवस्थे'च्या दृष्टीकोनातून अगदी निरुपद्रवी असलेली) निवडक सामाजिक कामं आहेत??

एकाबाजुला अशा धर्मसंपदायांचा 'हजेरीपट' वाढणं आणि दुसऱ्या बाजुला अशा दुर्दैवी अपघाती मृत्यूंचा 'पट' वाढणं किंवा एकाबाजुला स्थानिक महिलांचा धर्मसंप्रदायी हजेरी'पट' वाढणं आणि महिलांच्या रक्तातलं हिमोग्लोबीनचं प्रमाण कमालीचं घटणं...ही भयंकर विसंगती, फक्त मुरबाड-शहापूरमध्येच दिसू शकते; कारण, आता अशा पंथ-संप्रदायांतून येथील लोकं षंढ आणि थंड घडवली जातायत. निरर्थक जपजाप्य करणारे आणि प्रवचनं झोडणारे, हे संप्रदाय म्हणजे बड्या राजकारण्यांचे हक्काचे मतांचे अड्डे बनलेत; म्हणून राजकारण्यांचं त्यांना भक्कम आर्थिक पाठबळ आहे... राजकारणी आणि संप्रदायी, एकमेकाच्या हातात हात घालून व भोळ्याभाबड्या जनतेच्या डोळ्यात धूळफेक करत, आपापलं हित बेमालूम साधत असतात. त्यामुळे, कुठल्याही जगण्याच्या समस्येविषयीची स्थानिक जनतेत अजिबात जागरुकता नाही. अन्याय-भ्रष्टाचाराबद्दल तर तिला काहीही वाटेनासं झालंय. गावोगावच्या रस्त्यांची दुर्दशा ('साजगाव-किसळ', हा आमच्या शेतघरासमोरील ३ कि. मी. चा रस्ता तर तब्बल गेल्या ४० वर्षात एकदाही धड बनवला गेलेला नाही...कागदावर मात्र, तो अनेकदा होऊनही गेलेला असेल व संबंधित राजकारणी-कंत्राटदारांकडून जनतेच्या पैशाची लूट केली गेलेली असेल), विजेचा लपंडाव वगैरे प्रकार अगदी नित्याचेच! एमआयडीसी कारखान्यांमधील व एमएसईबीमधील लाखो तरुण कंत्राटी-कामगारांचा जगण्याचा नित्याचा कोंडमारा... हे या समृद्धीला पावणाऱ्या दोन्ही तालुक्यांचं लज्जास्पद व संतापजनक वैशिष्ट्यच!

रोहिणीच्या दुर्दैवी मृत्युने हा सारा भ्रष्टाचार व व्यवस्थेतल्या भयंकर व अक्षम्य त्रुटी चव्हाट्यावर आल्यामुळे...इथून पुढे तरी व्यवस्थेला जाग येईल, अशी अपेक्षा करावी का?

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)




*मुंब्रा येथे रेल्वे अपघातात बळी पडलेल्या, प्रवाशांप्रति सहवेदना व्यक्त करण्यासाठी, 'धर्मराज्य पक्षा'च्या वतीने बुधवार, दि. ११ जून-२०२५ रोजी, ठाणे रेवे स्थानक परिसरात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी फलकांच्या माध्यमातून, रेल्वे प्रशासनाचा ढिसाळ कारभार आणि उदासीन भूमिकेविरोधात, निषेधाच्या घोषणा व्यक्त करीत, प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला. याप्रसंगी 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांच्या आदेशानुसार आयोजित करण्यात आलेल्या या श्रद्धांजलीच्या कार्यक्रमाचे नेतृत्व, पक्षाचे सहसचिव श्री. नरेंद्र पंडित यांनी केले होते. यावेळी 'धर्मराज्य पक्षा'चे प्रवक्ते श्री. समीर चव्हाण, ठाणे लोकसभा उपाध्यक्ष श्री. महेशसिंग ठाकूर, श्री. सचिन शेट्टी, 'धर्मराज्य रिक्षा संघटने'चे श्री. रमेश रेड्डी, श्री. सुशीलकुमार चंद्रा आदी पदाधिकाऱ्यांसह, श्री. संजय दळवी, श्री. सोपान चौधरी, श्री. अमित लिबे, श्री. निलेश सावंत, श्री. अनिल डांगळ, श्री. सुनील जाधव, श्री. संतोष मोरे, श्री. सुनील डांगळ इत्यादी कार्यकर्ते आणि कामगार सदस्य मोठ्यासंख्येने उपस्थित होते.*

भांडवलशाहीत माणसांमधला संवाद वाढतो, प्रगत व प्रगल्भ बनत जातो. तो बहुशः धंदेवाईक स्वार्थ साधण्यापुरताच! त्यातही, बऱ्याचदा सत्य झाकलं जातं व व्यावसायिक-स्वार्थप्रेरित 'असत्या'चं अवडंबर माजतं. भांडवली-व्यवस्थेचा प्रचार करणाऱ्या मेंदुतील वा भांडवली-व्यवस्था राबवणाऱ्या शरीरातील...व्यक्तिगत-स्वातंत्र्य, लोकशाही वगैरे संकल्पनांचे 'पेशीसमूह' मुळातूनच कॅन्सरग्रस्त झालेले असतात; मक्त, साम्यवादी-समाजवादी विचारसरणीचं आव्हान जिवंत असेपर्यंत ती रोगग्रस्तता झाकल्या कोंबड्यासारखी दडून रहाते! तत्त्वांवर नव्हे; तर फक्त, पैशाच्या इमल्यांवर उभारण्यात आलेली ही व्यवस्था होय! पैसा खिशात रहातो, तत्त्वं अंतःकरणात रुजतात...त्यांना कोणी हात घालू शकत नाही. म्हणूनच पैशाने उभे केलेले इमले, पैशानेच ढासळताना दिसतात.

# “आप भारत की राष्ट्रभाषा के बारे में जानना चाहते हैं, मुझे लगता है कि, भारत की राष्ट्रभाषा विविधता में एकता है!” ...कानिमोझी

स्वतःला ‘विश्वगुरु’ संबोधणारे (जगात कुणीही हिंग लावून फारसं कुणी विचारत नसतानाही) ‘ऑपरेशन-सिंदूर’बाबत भारताची बाजू मांडण्यासाठी व पाकिस्तानने पोसलेल्या दहशतवादाचा खरा चेहरा जगासमोर उघडा पाडण्यासाठी...स्वतः कुठेही न फिरता (कारण, त्या कथित विश्वगुरुची विश्वासार्हता, सततच्या थापेबाजीने देशात आणि परदेशात रसातळाला गेलेली असल्यानेच) एक सर्वपक्षीय खासदारांचं शिष्टमंडळ त्यांनी पाठवलंय.

त्या शिष्टमंडळातील एक गट डीएमके महिला खासदार कानिमोझी करुणानिधी यांच्या नेतृत्त्वाखाली जेव्हा स्पेनची राजधानी माद्रिदमध्ये पोहोचला; तेव्हा जाणिवपूर्वक त्या शिष्टमंडळाला तेथील पत्रकारांनी खोचक प्रश्न विचारला की, “तुमच्या देशाची ‘राष्ट्रभाषा’ काय आहे?”

त्यावर, कानिमोझी यांनी दिलेलं उत्तर अतिशय समर्पक आणि सगळ्यांनाच अवाक् करणारं ठरलंय व त्यातून, भाजप-संघपरिवाराने सध्या जगभर आपल्या देशाची जी नाचक्की चालवलीय...त्यावरचा, रामबाण इलाज ठरु पहातोय. जगभरात आपल्या देशाची मान उंचावणारं प्रभावी वक्तव्य करताना कानिमोझी म्हणाल्या, “आपण भारताच्या राष्ट्रभाषेविषयी जाणून घेण्यास उत्सुक आहात; तर, मला तुम्हाला हे सांगू द्या की, ‘विविधतेतून एकता’ हीच आमची राष्ट्रभाषा आहे!”

कानिमोझी, एवढ्या उदंड शहाणपणाने अशी मांडणी करत असताना व महाराष्ट्रात पहिल्या इयत्तेपासून हिंदी सक्तिची भाषा केली जात असताना...मर्यादित आकलनशक्ति; पण, अमर्यादित राजकीय-आर्थिक स्वार्थबुद्धी असलेली आमची



मराठी नेतेमंडळी “हिंदू, हिंदी, हिंदुराष्ट्र” वगैरे शब्दच्छल करत बसलीयत.

‘एक देश, एक भाषा’, ‘एक देश, एक संस्कृती’, ‘एक देश, एक निवडणूक’, वगैरे वगैरे जे अगदी बुलडोझर फिरवल्यासारखे जैववैविध्याने नटलेल्या आपल्या देशाचं, भाजप संघपरिवाराकडून जोरजबरदस्तीने ‘सांस्कृतिक-सपाटीकरण’ सुरु आहे; ते जैववैविध्याच्या नावाने बोंब असलेल्या ‘पाश्चात्य’ अथवा ‘अरबी’ धाटणीचं आहे...ते सपाटीकरण म्हणजे, भारतीय-अध्यात्माचा पायाच उखडून टाकणं आहे. आश्चर्य म्हणजे, “हिंदुत्वाच्या नावाखाली हा सगळा नंगानाच चालू आहे!”

यातूनच पुढे ‘एक राष्ट्र, एक पक्ष’ अशा... चीन-रशियासारख्या ‘हम करे सो कायदा’ नृशंस वृत्तीने जन्म घेतल्यास आश्चर्य वाटायचं कारण नाही.

साधारण पस्तीस वर्षांपूर्वी नव्वदीच्या दशकात ‘खाउजा-धोरण’ (खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण) राबवताना असाच ‘भांडवली-बुलडोझर’ जगभर व देशभरात रोरावत फिरवला गेला होता...त्याच्या भळभळत्या जखमा-वेदना अजूनही ताज्या असताना, चाल-लेला हा दुसरा घातकी प्रयत्न आहे आणि तो पूर्ण ताकदीने वेळीच उधळून लावला गेला पाहिजे.

...अन्यथा, ‘खाउजा-धोरणा’ने जशी ‘कंत्राटी-कामगार पद्धत’ देशभरात लादली जाऊन, एकाबाजुला करोडोंनी गुलामांच्या फौजांची आणि दुसऱ्याबाजुला त्यांचं रक्तघाम अत्यंत स्वस्तात विकणाऱ्या ‘राजकारणी-कंत्राटदारां’ची देशात प्रचंड सैतानी-पैदास केली गेली...तशी, एकछत्री वा हुकूमशाही पद्धतीने कारभार करणाऱ्या राजकीय व भांडवली ‘दहशतवाद्यां’ची मूठभर जमात, पिढ्यानपिढ्या देशात बेलगाम धुमाकूळ घालत राहील. वर्णवर्चस्ववादी-शोषक मानसिकतेचे ‘मनोरुग्ण’, मागच्या दाराने पूर्वीसारखीच; पण, सरड्यासारखा काळानुरुप थोडा रंग बदललेली ‘चातुर्वर्ण्य-व्यवस्था’ देशात ‘हिंदुत्वा’च्या गोंडस नावाखाली पुन्हा लादतील...तेव्हा, सावधान!

**।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।**

(संयुक्त-महाराष्ट्रानंतर ‘स्वायत्त-महाराष्ट्र’...राष्ट्रांतर्गत राष्ट्र, ‘स्वायत्त-महाराष्ट्र’...शिवछत्रपतीराष्ट्र!)

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## श्रीमंतीची रेषा एकदाची निर्धारित कराच...

जशी, फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी जागतिक-महामंदीनंतर अमेरिकन अर्थव्यवस्था व सामान्यांची दारुण अवस्था सावरताना... ‘नव्या करारा’द्वारे (New Deal) भांडवलदारांच्या नाकात वेसण घालून एकप्रकारे निश्चित केली होती!

...अमेरिकेची लोकसंख्या मर्यादित असली तरी दरडोई ‘कार्बन-ऊत्सर्जन’ भारतीयांच्या कैकपटीने असल्यानेच, प्रत्यक्षात ते संपूर्ण भारतीय लोकसंख्या जेवढं कार्बन-प्रदूषण करते...त्याहूनही अधिक प्रदूषण करत ‘जागतिक तापमानवाढी’त मोठी भर घालतेय... तेव्हा, ही ओंगळवाणी अतिश्रीमंती, केवळ मानवीय-दृष्टीकोनातूनच पहाता आता ‘अमानुष व घृणास्पद’ राहिलेली नसून; ती मानवी-अस्तित्वासह अवघ्या सजीवसृष्टीलाही मारक ठरु पहातेय!

भले, ॲमेझॉनवाला अब्जोपती (खरंतर, खर्व-निखर्वपती) जे ‘बेझोस’ला जागरुक अमेरिकन नागरिकांच्या आंदोलनामुळे आपल्या ‘घोड-लग्ना’चं स्थळ बदलावं लागलं असलं; तरीही, भांडवली प्रदूषणकारी व शोषक प्रवृत्ती, ती आणि तशीच आहे...आपल्याकडे नाही का अंबानीच्या मुलाच्या लग्नात वेगळं कुठे काय घडलं...???

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

## अधःपतन पुरुषसत्ताक व्यवस्थेचे !

*कधी काळी होती ती एक रचना –*
*कौटुंबिक, सामाजिक, परंपरांच्या विणीतील एक व्यवस्था,*
*जिचं मूळ होतं जबाबदारीत*
*आणि समजुतीत... म्हणे, संरक्षणाच्या नावाखाली.*
*पण हळूहळू तीच रचना झाली*
*सत्तेची, दबावाची,*
*माणसाच्या मनावर राज्य करणारी एक सावली –*
*पुरुषसत्ताक व्यवस्था.*
*तिच्या गर्भात उगम पावली असमानता,*
*स्त्रीच्या इच्छांना नाकारून,*
*पुरुषाच्या भावनांना गिळून टाकून,*
*आणि तिसऱ्या लिंगाच्या अस्तित्वालाच नाकारून,*
*ती ‘नियम’ झाली – पण नियम म्हणजे का न्याय?*
*अधःपतन सुरू झालं तेव्हा,*
*जेव्हा ‘सत्ता’ ही ‘मूल्यां’पेक्षा मोठी झाली,*
*जेव्हा ‘पुरुषत्व’ म्हणजे शिस्त, राग, आदेश*
*आणि ‘स्त्रीत्व’ म्हणजे संयम, सहनशीलता, मौन,*
*तेव्हा ही चौकटच कुजली होती,*
*पण कुणालाच तो दुर्गंध जाणवला नाही.*
*अधःपतन का होतंय?*
*कारण आता रचना उभीच राहू शकत नाही;*
*ती फक्त माणसांना दडपण्यासाठी वापरली जाते –*
*शरीरासाठी कायदे, पण मनासाठी जखमा.*
*शंभर वर्षांचे मौन*
*आज एकट्याच्या हृदयात घुमते,*
*आणि फाटलेल्या शांततेतून*
*उगम होतो – विद्रोहाचा, प्रश्नांचा, उलथापालथीचा.*
*हे अधःपतन आहे त्या सत्तेचे,*
*जिला टिकवण्यासाठी*
*माणुसकीचा बळी दिल्या गेला.*
*आज फक्त रडणारी स्त्रीच नाही,*
*तर रडणारा पुरुषही आहे,*
*आणि न दिसणारे, विसरलेले,*
*तिसऱ्या ओळीतले लोकही.*
*हा सडका गाभा कोसळतोय –*
*कारण त्यात ‘मानव’ हरवला आहे.*
*आणि जिथे माणूसच उरत नाही,*
*तिथे सत्ता जिवंत कशी राहील?*
*हे अधःपतन आहे पुरुषसत्ताक पद्धतीचे –*
*ज्याने माणसाचे ‘लिंग’ ठरवूनच स्वतःला हरवले..*
*स्पंदन...*

***गौरी चौधरी....***

# एका ‘शामभट्टाच्या तट्टाणी’ला...पं. नेहरुंसारख्या ‘इंद्राच्या ऐरावता’सह यच्चयावत सर्व पंतप्रधानांपेक्षा, निर्लज्ज–निरर्गल पद्धतीने मोठा दर्जा देऊ पहाणाऱ्या...AM–आयटी सेलची लक्तरं काढणं काय असतं, ते बघाच....

**‘आय.क्यू.’ (I.Q.) अतिशय कमी असलेला पहिला पंतप्रधान... उदा. गटारातल्या गॅसवर स्वयंपाक करणारा, पाकिस्तानच्या रडारला चकवण्यासाठी ढगाआडून सर्जिकल–स्ट्राईक करणारा आणि अस्तित्वात नसलेल्या रेल्वे–स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर चहा विकणारा...समजा, अशातऱ्हेनं पंतप्रधानांच्या बुद्धीवर टिपणी केल्याबद्दल; जर कुणावर बदनामीचा खटला भरला गेला आणि न्यायाधीशाने कुणाला शिक्षा केलीच; तर, ती यासाठी असेल की, त्याने ‘भारताचं सर्वोच्च राष्ट्रीय गुपित’ जगासमोर उघडं केलं म्हणून....**

– शैक्षणिक पदवीसह, आपल्या वैवाहिक ‘सिंदूरा’चा थांगपत्ता लागू न देणारा पहिला पंतप्रधान....

– कोणी ऐको न ऐको सतत ‘मन की बात’ करणारा; पण, ‘जन की बात’ साफ ठोकरणारा पहिला पंतप्रधान....

– थापेबाजी, जातधर्मविद्वेष व ढोंगबाजीचा शब्दशः कहर माजवणारा पहिला पंतप्रधान....

– डोनाल्ड ट्रंपसारख्या विकृत, गुन्हेगार व बलात्कारी राष्ट्रप्रमुखाचा खास दोस्त असलेला पहिला पंतप्रधान....

– ‘‘न खाऊंगा, न खाने दूंगा’’, अशी भंपक घोषणाबाजी करत भ्रष्टाचाराला नुसती मोकळीकच नव्हे; तर, प्रचंड उत्तेजन देणारा व भ्रष्टाचाराचं ‘संस्थानीकरण’ करणारा पहिला पंतप्रधान (उदा. इलेक्टोरल–बॉण्ड आणि PM-Care घोटाळा आणि देशातल्या बड्या राजकारणी भ्रष्टाचाऱ्यांना पक्षात व मंत्रिमंडळात ‘पावन’ करुन घेणे)....

– निवडणूक–आयोगाला ताटाखालचं मांजर बनवून ‘निवडणूकपूर्व व निवडणूकपश्चात’ अशा दोन्ही घोटाळ्यांतून, निवडणूक–प्रचारातील बेधडक ‘जुमलेबाजी’तून; तसेच, एतच् घोटाळ्यातून व बड्या भांडवलदारांच्या प्रचंड काळ्या पैशातून निवडणुका जिंकणारा पहिला पंतप्रधान....

– निवडणूक हरल्यास ईडी/सीबीआय/आयटीच्या धाकदपटशहाच्या माध्यमातून विरोधी पक्षांचे खासदार/आमदार फोडून गैरमार्गाने सत्तासोपान चढणारा व चढवणारा पहिला पंतप्रधान....

– चीनला लडाखच्या गलवान खोऱ्यातील ४ हजार चौ. कि. मी. भारतीय भूमी ‘दान’ देणारा, सर्जिकल–स्ट्राईक्सची ‘सत्यस्थिती’ लपवून ठेवणारा आणि ‘फेल्ड–स्टेट’ असलेल्या पाकिस्तानसमोर ‘फेल’ ठरणारं ‘राफेल’ खरेदीचा घोटाळा करणारा पहिला पंतप्रधान....

– ‘विश्वगुरु’ म्हणवणारा; पण, जनतादलातल्या नेत्यांना जसे अनुयायी नसतात...तसा, जगभरात कुणीही त्याचा ‘शिष्य’ वा अनुयायी (अगदी मित्रसुद्धा) नसलेला पहिला आगळावेगळा ‘विश्वगुरु पंतप्रधान’....

– राममंदिर उभारणारा; पण, गेल्या एका तपात देशभरात सामान्य जनतेसाठी एकही नाव घेण्याजोगी ‘सार्वजनिक शाळा–शिक्षणसंस्था’ अथवा ‘सार्वजनिक इस्पितळ’ ‘न’ उभारणारा पहिला पंतप्रधान....

– श्रीमंत बापाच्या बेजबाबदार उधळ्या मुलासारखी, ‘‘देशाची मूलभूत साधनसंपत्ती असलेले सार्वजनिक प्रकल्प–उद्योग, जमिनी, खाणी, जंगलं विकणाराफक्र आणि निव्वळ आपल्या निवडक बड्या भांडवलदार–मित्रवर्गाचं ‘उखळ पांढरं’ करण्यासाठी सरकारी–दहशतीने बेलगाम ‘खाजगीकरणा’चा बुलडोझर चालवणारा पहिला पंतप्रधान....

– ‘रोम जळत असताना फिडेल वाजवणाऱ्या निरोफ’सारखा...मणिपूर जळत असताना बेफिकिरीने वावरणारा व आजतागायत मणिपुरसारख्या अशांत प्रदेशात पायदेखील न ठेवणारा पहिला बेजबाबदार पंतप्रधान....

– पत्रकार–परिषद घेण्यास घाबरणारा, तरीही ५६’’ छातीचा बेमालूम देखावा आपल्या ‘अंधभक्तां’साठी उभा करणारा; तसेच, टेलिप्रॉम्प्टरच्या मदतीने भाषणे करणारा पहिला पंतप्रधान....

– हजारो कोटींची विमाने–गाड्या, लाखो रुपयांची जॅकेट्स, अत्यंत महागडी घड्याळे–गॉगल्स व इतर किमती चीजवस्तू वापरुनही स्वतःला ‘फकिर’ संबोधण्याची हिंमत दाखवणारा पहिला ढोंगी पंतप्रधान....

– कायदेशीर बंदी असतानाही लष्करी–गणवेष ‘फॅशन शो’सारखा वापरणारा पहिला पंतप्रधान....

– कामगारांचं व कामगार–चळवळीचं पूर्ण खच्चीकरण करण्यासाठी ‘काळी कामगार–संहिता’ (Black Labour Code) लादून, त्यांना गुलामगिरीत ढकलू पहाणारा पहिला पंतप्रधान....

– सरतेशेवटी सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, ‘‘भारतीय जनतेच्या शिव्याशापांचा सगळ्यात मोठा ‘धनी’ असूनही EVM मधून धो धो मतं मिळवण्याचा चमत्कार घडवणारा’’ पहिला आणि शेवटचा सेटिंगबाज पंतप्रधान....

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# सर्वसामान्य भारतीय जनतेच्या दृष्टिकोनातून इराण–इस्त्रायलमधील आठवडाभर चाललेल्या युद्धातील काही महत्त्वाच्या ठळक बाबी....

– काल २० जूनला परदेशी पत्रकारांना इस्त्रायलच्या बीरशेबा शहरातील ‘सोरोका’ हॉस्पिटलचं इराणी हल्ल्यात झालेलं नुकसान दाखवण्याचं इस्त्रायल–सरकारने अचानक रद्द केलं; कारण, अर्थातच त्याच्या आड इस्त्रायली लष्करी तळ दडलेला असणार म्हणूनच केवळ! असे अनेक लष्करीतळ, इस्त्रायल सरकारने दाट लोकवस्तीत जाणिवपूर्वक उभारलेत, जेणेकरुन शत्रूराष्ट्राला त्यांच्यावर हल्ले करणं, कठीण व्हावं आणि हल्ला केल्यास इराणसारख्या शत्रूराष्ट्राला आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनाम करणं सोपं व्हावं.



– ७ ऑक्टोबर–२०२३ च्या हमासच्या हल्ल्यानंतर इस्त्रायलमधील सगळ्या पॅलेस्टिनी कामगारांना हुसकावून लावण्यात आलं होतं आणि त्याजागी, जीव धोक्यात घालून १०,००० उत्तर भारतीय कामगारांना मोदी–सरकारने युद्धजन्य स्थितीतही इस्त्रायलमधे पाठवले होते; पण, इराणच्या खतरनाक क्षेपणास्त्र हल्ल्याप्रसंगी सर्व इस्त्रायली नागरिकांना सुरक्षित बंकरमध्ये रहाण्यासाठी सरकारने पाठवले...मात्र, या भारतीय कामगारांना बंकरमध्ये प्रवेश नाकारुन उघड्यावर मरण्यासाठी मोकळं ठेवण्याचं क्रौर्य व दुष्टपणा नेत्यान्याहूच्या कृतघ्न इस्त्रायल सरकारने दाखवला.

– अमेरिकन ट्रंप सरकार भारतीय स्थलांतरितांना साखळदंडाने बांधून जबरदस्तीने विमानाने पाठवत असताना आणि त्यांची पाठवणी करण्यापूर्वी व पाठवणी करताना अत्यंत अपमानास्पदरित्या त्यांना वागवत असताना...ज्या इराणच्या विरोधात भूमिका घेऊन मोदी–सरकार नेत्यान्याहूच्या अन्याय–अत्याचारी इस्त्रायली सरकारला पाठींबा देत आहे; त्याच खोमेनींच्या इराण–सरकारने सन्मानपूर्वक इराणी विमानांतून सुरक्षितरित्या इराणमधील भारतीय नागरिकांची पाठवणी सुरु केलीय, हे विशेष.

***...राजन राजे***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# तुम्ही मुंबईतल्या खानावळीत कधी जेवला आहात काय?

## जातिभेदाला पहिली थप्पड...


### प्रबोधनकार ठाकरे

जुन्या मुंबईत चहाचे हॉटेल आणि पाव-बिस्कुटाची बेकरी हे दोन धंदे प्रामुख्याने भंडारी लोकांच्या हातांत होते. सबंध मुंबईला ब्रेड, पाव, लिमजी बिस्किटे या भंडारी बेकऱ्याच पुरवीत असत आणि गोऱ्या लोकांच्या खाणावळीतही त्या ब्रेड पावांची लज्जत वाखाणली जात असे. काही भंडारी हॉटेलात चहाशिवाय मांसाहाराची फार चोखट सोय असे आणि अशी तीन-चार जुन्यांतली जुनी भंडारी हॉटेले कोटांत नि गिरगांवात अजून चालू आहेत. **भंडारी हॉटेलातच चहा मिळत असल्यामुळे, बामणांची पंचाईत व्हायची. गिरगांवात एक-दोन बामणांची छुपी हॉटेले गल्लीकुच्चीत असायची. तेथे गुपचूप जाऊन कित्येक बामण चहाची तलफ चोरून भागवीत असत. कारण, त्याकाळी हॉटेलात उघडपणे चहा पिणे अथवा काही खाणे प्रशस्त मानले जात नसे. चार-पाच मंडळींनी कुडाच्या पडद्याआड गुपचुप बसून खावे प्यावे नि पसार व्हावे. दारूच्या गुत्त्यांत शिरणारांकडे लोक जितक्या कुत्सित काण्या नजरेने पाहत नि धिक्कार दर्शवीत, त्याच नजरेने लोक हॉटेलगामी प्राण्यांकडे पाहत असत. मात्र या बामणी छुप्या हॉटेलात बामणांचाच प्रवेश व्हायचा. इतरांना तेथे मज्जाव असायचा.**

पहिल्यापासूनच मुंबई शहर म्हणजे नोकरमान्यांचे माहेरघर. बाहेरगांवाहून नोकऱ्यांनिमित्त तरुणांच्या टोळ्याच्या टोळ्या नित्य येथे यायच्या. बिन-हाडाची (म्हणजे चंबूगबाळे ठेवण्याची सोय एखाद्या ओळखीच्या किंवा नातेवाईकाच्या ओसरीवर झाली, तरी मम्मंची ब्याद तो किती दिवस भागवणार? अर्थात, सार्वजनिक खाणावळीची आवश्यकता पुढे आली. या दिशेने पहिला धाडसी यत्न भटवाडीतल्या सखूबाईने केला. विधवा बाईने असा एखादा स्वतंत्र धंदा अगर व्यवसाय करणे, ही कल्पनाच त्या काळी मोठी बंडखोर. शहाण्यासुरत्यांच्या भावना एकदम जखमी व्हायच्या! पण सखुबाईने सर्व सामाजिक विकल्पांना झुगारून खाणावळीचा धंदा सुरू केला. मुंबईच्या हिंदू खाणावळींच्या इतिहासात या सखूबाईचे नाव अग्रगण्य आहे. सखूबाईने खाणावळ उघडताच, पहिला मोठा पेचप्रसंगाचा प्रश्न आला, तो म्हणजे आमच्या नाठाळ जातीभेदाचा. खाणावळीत बामण येणार तसे इतर अठरापगड बामणेतरसुद्धा येणार. या सगळ्यांच्या निरनिराळ्या जातवार पंगती मांडायच्या तर मलबार हिलचे अंगणसुद्धा पुरायचे नाही. आणि बामणेतरांच्या पंगतीला बामणे जीव गेला तरी बसायची नाहीत. या पेचावर सखूबाईने दणदणीत तोड काढली. तिने प्रत्येक अन्नार्थी बुभुक्षिताला स्पष्ट बजावले- माझी खाणावळ अन्नार्थ्यांसाठी आहे. मी बामण ओळखीत नाही नि जातपात मानीत नाही. **प्रत्येक हिंदुला मी एका पंगतीला सारखे वाढणार... अगदी पाटाला पाट नि ताटाला ताट भिडवून वाढणार. जरूर असेल तर त्यांनी यावे, नसेल त्याने खुशाल भुके मरावे. मला त्याची पर्वा नाही. कोणी कुरबुर दुरदुर करील, त्याला भरल्या ताटावरून ओढून उठवून हाकलून देईन.**

झाले. कर्दनकाळ सखूबाईचा हा दण्डक जाहीर होताच, यच्चावत बामणे नि बामणेतर खाणावळीत पाटाला पाट भिडवून गुण्यागोविंदाने जेऊ लागले. सकाळ संध्याकाळ





हजार-पाचशे पाने उठू लागली. हाताच्या बोटांवर मोजण्याइतके काही कर्मठ ब्राम्हण, सखुबाईच्या खास मेहरबानीने मुकटे नेसून एका लहानशा अंधाऱ्या खोलीत सोवळ्याने जेवत असत. त्या खोलीला सखूबाई 'विटाळशीची खोली' असे म्हणत. मोठ्या पंगतीत वाढणी चालत असली म्हणजे साहजिकच या सोवळ्या बामणांकडे वाढप्यांचे दुर्लक्ष व्हायचे. अहो, आमटी आणा, चपाती आणा, हे आणा, ते आणा. असा ते ओरडा करायचे. बराच ओरडा झाला की सखूबाई गरजायची, अरे बंड्या, त्या विटाळशा बाया काय बोंबलताहेत तिकडे पहा. त्या सोवळ्या जेवणारांनी तक्रार केली, तर बाई स्पष्ट सांगायची, हे पहा, मोठ्या पंगतीचे काम टाकून तुमच्याकडे 'पेशल' पाहणार कोण? तुम्हाला सगळे 'पेशल' पाहिजे तर ते मला जमणार नाही. वाढप्याच्या सोयीसोयीनेच घेतले पाहिजे तुम्हाला. चांगले मोठ्या जमातीत बसून गुण्यागोविंदाने खावे, गप्पागोष्टी सांगाव्या, ते बसता कशाला त्या अंधाऱ्या खोलकटांत सुतक्यासारखे ?

**सखूबाईचे उदाहरण पाहून मागाहून गिरगांवात आणखी तीन-चार ब्राह्मण विधवांनी खाणावळीचा उपक्रम केला आणि तो अगदी सखूबाईच्या शिस्तीने चालवला. झावबाच्या वाडीतली भीमाबाई आणि मुगभाटातली चंद्रभागाबाई यांच्या खाणावळी सारख्या जोरात चालत असत. दरमहा रुपये सात आणि साडेसात, असे दोनच भाव असत. सातवाल्यांना ताक आणि साडेसातवाल्याना दूध-दही एवढाच फरक. बाकी सगळी व्यवस्था सारखी. त्यात प्रपंच नाही. रविवारी काहीतरी स्पेशल बेत असायचा आणि तो मंडळीना विचारून ठरायचा.** सणावारी मिष्टान्न भोजनाच्यावेळी कोणी कमी जेवले तर बाई उस्तळायची, कायरे, आधी कुठे हाटेलात शेण खाऊन आला होतास वाटतं? असा भरमंडळीत टोमणा द्यायची. प्रत्येक आसामीला दरमहा चार पाहुण फुकट. मग ते 'स्पेशल' बेताला अथवा सणावारी आणले तरी तक्रार नाही. एखादा इसम दोन-तीन वेळा आला नाही, तर सखूबाई लगेच त्याच्या बिऱ्हाडी आपला माणूस पाठवून चौकशी करायची आणि आजारी असला तर तो बरा होऊन जेवायला परत येईपर्यंत दोन्ही वेळेला साबुदाण्याची पेज बिनचूक घरपोच पाठवावयाची. हा प्रघात बाकीच्या सर्व खानावळीतही पाळत असत.

सखूबाईच्या तोंडाला फारसे कोणी तोंड देत नसत. देईल त्याचे असे काही वाभाडे काढायची ती, का सगळ्या पंगतीची भरमसाट करमणूक! तिचा तोंडपट्टा चालला असता मध्येच कोणी काही बोलला तर एक पेटंट वाक्य असायचे, चूप, मध्येच मला 'टरप्रॅट' करू नकोस. अरे, एवढा मोठा तो जस्टिस रानडा नि तो चंद्रावर्खर ! माझ्या खाणावळीत जेवले म्हणून हायकोडताचे जड्ज झाले, समजलास. एखादाचे दोन महिन्यांचे बिल थकले आणि तो लाजेकाजेसाठी खाणावळीत येण्याचे टाळू लागला, तर बाई त्याला मुद्दाम बोलावून आणायची आणि हात धरून जेवायला घालायची. मग सगळ्या पंगतीत त्याची कानउघाडणी करायची, अरे मुंबईची नोकरी म्हणजे अळवावरचं पाणी. आज गेली तर उद्या मिळेल दुसरी. पण मेल्या, उपाशी राहून तू काय करणार? उपाशी पोटाने नोकऱ्या मिळत नाहीत. तुझा हात चालेल तेव्हा दे पैसे. पण जेवायला टाळाटाळ करशील तर ओतीन भाताचे आधाण तुझ्या बोडक्यावर. पंगती चालल्या असताना, कमरेवर हात देऊन बाई पंगतीतून शतपावल्या घालायची. प्रत्येकावर काही ना काही टीका, टिप्पणी, टिंगल सारखी चालायची. सणावारी तर पोटभर जेवण्यावर तिचा फार मोठा कटाक्ष. मधून मधून एका रांगेने चार-पाच बामणे सारखे बसलेले पाहिले का मग सोवळ्यावर सखूबाईंचे टिंगलपुराण असे काही बेफाम चालायचे का पुढच्या खेपेला ते सारे बामण पंगत मोडून सरमिसळ बसायचे.

तात्पर्य, सहभोजनाने जातीभेदाचे बंध तुटले नाहीत तरी किंचित ढिले पाडण्याची कामगिरी आजकालच्या समाज-सुधारकांच्या कल्पनेत फुरफुरण्यापूर्वीच सखूबाईने हा धाडसी प्रयोग केलेला आहे आणि त्याचे महत्त्व हिंदूंच्या सामाजिक सुधारणेच्या इतिहासात डावलता येणार नाही.

**प्रबोधनकार ठाकरे**

# ''सारसबाग बंदी : धर्मांध मथळ्याआड दडवलेली असहिष्णुतेची शिदोरी''- एक खुलं पत्र खासदार मेधाताई कुलकर्णींना

प्रति,
**मेधाताई कुलकर्णी,**
***(कुचकामी खासदार, राज्यसभा)***

ईदच्या दुसऱ्या दिवशी, आपण पुण्यातील प्रसिद्ध असे सारसबाग बंद ठेवण्याचा फतवा काढल्याचे समजले आणि या फतव्यावर संबंध पुणेकरांना अतिशय निकृष्ट दर्जाच्या सोयीसुविधा देणाऱ्या आणि संबंध पुण्यातील, सर्वच रस्त्यांची वाट लावणाऱ्या अकार्यक्षम महानगरपालिकेने, दखल घेत, आपले शाही-फर्मान डोक्याला लावून, सारसबाग ईदच्या दुसऱ्या दिवशी बंद ठेवल्याचेदेखील समजले. एकूणच, कुठल्यातरी शाळेच्या एका कोपऱ्याची हिरवी रंगवलेली भिंत, भगवी करण्यापासून सुरु झालेला खालच्या दर्जाचा प्रवास, आता उद्याने बंद करण्यापर्यंत येऊन ठेपला आहे. पुढे तो महानगरपालिका निवडणुकांच्या आधी कुठपर्यंत जाईल याचा अंदाज न लावलेला बरा. यातून आपल्या कामाचा दर्जा दिवसेंदिवस घसरत तर आहेच; पण, याने आपल्या स्वपक्षात हिंदुत्वावरून चाललेल्या स्पर्धेत, आपण दोन पावले पुढे याल अशीही खात्री, आता पेठेतील पुणेकरांना वाटू लागली आहे. त्यामुळे तुमच्या माध्यमातून एखाद्या इच्छुक उमेदवाराला, महानगरपालिका निवडणुकीत पक्षाकडून उमेदवारी मिळवून देण्यात आपण रडून रडून का होईनात, पण यशस्वी व्हालच असं वाटतंय. एवढं यश पुरे आहे ना?

ताई, सारसबागेत प्रसिद्ध असा तळ्यातील गणपती आहे. बरेचजण मनोभावे गणपतीच्या दर्शनाला याठिकाणी येतात. अशा ठिकाणी ''कुठल्याही धर्मियांनी मांसाहार करु नये'' असा नियम करणे एकदा समजू शकतो... पण, एका विशिष्ट धर्मियांना फक्त येण्यासाठी मज्जाव करणे हे, कितपत योग्य आहे? पण, आपला इतिहासच समाजबहिष्कृत करण्याचा असल्याने, तो वारसा याही माध्यमातून पुढे नेला जातोय का? हा ही प्रश्न इथे पडतो. आधीच्या काळी शुद्रतिशूद्रांना पाणी पिऊ दिले जात नव्हते, त्यांचा स्पर्श झाला तरी, आपल्याच इथे काहीजण अशुद्ध व्हायचे. हा एक इतिहास आणि त्या विरोधातील संघर्ष आपल्याला माहीतच आहे. तोच संघर्ष आता, अशा उद्यानांच्या माध्यमातून उभा रहावा, ही आपली इच्छा आहे का? असेल तर, आपल्याला पराभवासाठी खूप साऱ्या शुभेच्छा आहेत ताई.

मी हे मान्य करतो की, एखाद्या मुस्लिमाने कसलाही चुकीचा हेतू मनात न बाळगता, कधीतरी उद्यानात मांस आणले असावे. जे चुकीचेच राहील. पूर्ण समाजाची जबाबदारी कोणीही घेऊ शकत नाही. पण, यावर सर्वांसाठी नियम काढून, त्या गोष्टी बंद करता येऊ शकत होत्या, ज्या खूप सोप्या होत्या आणि त्याला कोणाचा आक्षेपदेखील नसला असता. उलट मुस्लिमांनीच त्यानंतर कोणी तिथे मटण घेऊन आले असते तर, त्याला फटकवले असते. तुमची गरजही पडली नसती. पण, एवढ्या समजूतदारपणाची अपेक्षा आपल्याकडून कशी ठेवली जाऊ शकते?

बरं, फक्त मांसाहार केल्याने उद्यानाचे पावित्र्य भंग होते का? की, उद्यानात ठिकठिकाणी बसून अश्लील चाळे केल्यानेही, उद्यानाचे पावित्र्य भंग होते, याचाही थोडा आढावा घ्यावा लागेल. सारसबागेत वेगवेगळ्या सणांच्या वेळी नाचताना अश्लील हावभाव केल्याने, उद्यानाचे पावित्र्य भंग होते का नाही? हा ही प्रश्न मला उपस्थित करायचा आहे आणि त्यावर आपण कधी आणि कसली भूमिका घेतली? त्याबद्दल आपण कधी उद्यान बंद ठेवणार आहात? हा प्रश्नदेखील मी उपस्थित करु इच्छितो.

ताई, 'बीबीसी'वर तुमची प्रतिक्रिया पाहिली.. तुम्ही संबंध मुस्लिम समाजाला एका पेठीय चष्म्यातून पाहून, माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम, कर्नल सोफिया कुरेशी यांचा तुम्ही आदर करता असे म्हणालात. मुळातच तुम्ही यांचादेखील आदर करत नाही. या दोन विभूती ज्या समाजातून येतात, त्या समाजाचा प्रचंड द्वेष करुन, तुम्ही त्यांचा सन्मान करता असे म्हणणे हास्यास्पद राहील. ताई तुम्ही तसे म्हणता म्हणून मला म्हणावे लागेल की, आम्ही गोपाळ गणेश आगरकर, दाभोलकर यांना खूप मानतो. पण, तुमच्यासारख्या काही लोकप्रतिनिधी यांना आम्ही कधीही आदर्श मानू शकत नाही.

ताई, याच अनुषंगाने आणखीन एक अतिशय महत्वाचा मुद्दा मांडावा वाटतो... कोरटकरसारखा व्यक्ती, आई जिजाऊंच्या बाबत अतिशय आक्षेपार्ह बोलला, सोलापूरकरसारख्या शिवद्रोहीने शिवरायांचा अवमान केला. कुलकर्णी नावाचा एक शिवद्रोही, शिवसृष्टीच्या बोर्डवर लघुशंका करतो. यावेळी तुम्ही कोणाला कसले निवेदन दिले ताई? यातले दोन आरोपी तर पुण्यात आहेत ताई. तुमच्या समाजाचे शिवद्रोही असताना, तुम्ही त्यावर कुठले निवेदन कुठल्या विभागात दिले हे जरा सांगता का? ही सगळी तुमची 'संघ आणि भाजपची लोक' आहेत. यांच्या विरोधात तुम्ही कधी बोललेले दिसला नाहीत. तुमचा सिलेक्टिव्हपणा यातून समजून आला ताई.

शेवटी एक मुद्दा घेऊन पत्र संपवतो... ताई, तुम्ही महिला आहात. महिलांचे प्रश्न, समस्या याची तुम्हाला जाण 'क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले' यांच्या कृपेने असेल असे मला वाटते. कुठलाही सण आला की, स्त्रियांना अधिकचे काम आलेच आणि या कामातून थोडीशी उसंत मिळावी म्हणून, सणाच्या दुसऱ्या दिवशी लोक आपापल्या घरातील स्त्रियांना, उद्याने आणि जवळच्या बागांमध्ये घेऊन जात असतात आणि अशावेळी तुम्ही जर बाग बंद ठेवण्यासाठी निवेदन देणार असाल; तर, ताई एक महिला म्हणूनदेखील याची तुम्हाला लाज वाटायला हवी. जे स्वातंत्र्य तुम्ही अनुभवता, त्यातलं जर काही स्त्रियांना कधीतरी भेटत असेल; तर, ते स्वातंत्र्यदेखील हिरावून घेण्याचे काम तुम्ही करत आहात, हेदेखील तुम्ही लक्षात ठेवा.

ताई, सारसरबागेत मुस्लिम आल्याने कोणालाही कसलाही त्रास नाही. उलट आजूबाजूच्या व्यावसायिकांचा यानिमित्ताने खूप व्यवसाय होतो, जे व्यावसायिक बहुतांश हिंदूच आहेत. राहिला प्रश्न मांसाहाराचा; तर, ते बंद करा. रोगापेक्षा इलाज भयंकर करु नका. नाहीतर असे व्हायचे, जखम 'शेंडीला आणि मलम मांडीला'... समजलं तर ठीक.

***....पैगंबर शेख***
पुणे, महाराष्ट्र

---

''जागतिक तापमानवाढीचा आनुषंगिक परिणाम म्हणून गाढवं शहाणी व्हायला लागलीयत (पूर्वीसारखी माणसांची बिनतक्रार हुकूमत आता ती मानत नाहीत); तर, माणसं गाढवासारखी वागायलीयत अन् जातधर्मविद्वेष, युद्धोन्माद, माणूस व निसर्गाचं टोकाचं शोषणफ यात अधिकाधिक गुंतू लागलीयत!''

....एका आंतरराष्ट्रीय मानसतज्ज्ञांच्या पथकाचा पहाणी अहवाल

--------------------

वरील बातमीतले, आपले पूर्वज असलेले 'माकड', आपल्याला 'शहाणपणः शिकवू पहातेय की, ''सरतेशेवटी, चलनी नोटा, या केवळ 'कागदमात्र' आहेत (हा 'धडा', एक 'राजकीय गधडा', वेगळ्या अर्थाने आपल्याला आठनऊ वर्षांपूर्वीच शिकवून गेलाय)...त्या खाऊन काही 'उदरभरण' होऊ शकत नाही!''

आधुनिक भांडवली अर्थव्यवस्था व जीवनशैलीजन्य कार्बन-ऊत्सर्जनातून उद्भवलेल्या जागतिक तापमानवाढीच्या महासंकटामुळे पुढील काही दशकातच, समस्त मनुष्यजातीला, वरील वैश्विक-सत्याचा प्रलयंकारी सामना करावा लागेल...तेव्हा, आपल्या अस्तित्वाचे पंख मिटले जात असताना मनुष्यमात्राला हे कळून चुकेल की, ना अन्न पिकवणारी सुपीक माती कुठल्या कारखान्यात तयार होत, ना जगण्यासाठी लागणारं अन्न कुठल्या कारखान्यात आपसूक तयार होत. घरात-बँकेत खच्चून भरलेल्या अब्जावधींच्या नोटा, जमीनजुमला-मालमत्ता, ब्लूचिप कंपन्यांचे शेअर्स, सोनंनाणं, हिरेमोती, अलंकार सगळं सगळं निसर्गाच्या रौद्रभीषण अवतारापुढे मातीमोल ठरणार आहे आणि ते आकळण्यास लावलेल्या अक्षम्य कालहरणाने, अवघ्या सजीवसृष्टीसह मनुष्यजातीचा अतिशय यातनामय असा करुण अंत घडून येईल.....

रक्तपिपासू-निर्मम-शोषक भांडवली-व्यवस्थेनं (Vampire-State System) पिढ्यापिढ्यांचं निसर्गस्नेही उपजत शहाणपण असलेल्या ''नराचा वानर'' आणि ''शहाण्याचा गाढव'' बनवलेला असल्याने आणि 'भांडवली-व्यवस्थे'चं मानवीसमूहाला अनावर असं आत्मघातकी 'व्यसन' जडलेलं असल्याने, वेळीच यातून कुणी बोध घेईल...ही शक्यता, केव्हाचीच संपुष्टात आलीय!

***...राजन राजे***
*(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष...भारतातील पहिलावहिला निसर्ग-पर्यावरणस्नेही 'हरित-पक्ष'...The First 'Green-Political Party' Of India)*

# मराठीच्या मरणकळा आणि फडणवीस यांचे वकिली चातुर्य

पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्याचा निर्णय घेतल्यानंतरही राज्य सरकार त्याबाबत विचित्र सारवासारव करत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वकील असल्याने आणि भाजपचे भक्तगण चुकीची माहिती देण्यात अग्रेसर असल्याने, त्यांनी हिंदी सक्तीची केली नसल्याचे उच्च कंठाने सांगण्यास सुरूवात केली आहे. पण याबाबत वस्तुस्थिती हीच आहे की, या निर्णयामुळे मराठीचे मरण जवळ येणार आहे. सरकार करत असलेले दावे आणि प्रत्यक्षातील स्थिती नक्की काय आहे, हे सहजपणे समजता यावे यासाठी हा लेखनप्रपंच उपयुक्त ठरेल.

**सरकारी दावा क्रमांक १) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार त्रिभाषा सूत्र अवलंबिण्यात आले आहे. त्यानुसार पहिलीपासून तिसरी भाषा शिकण्याचा आदेश काढण्यात आला आहे.**

वस्तुस्थिती – मोदी सरकार आल्यानंतरच त्रिभाषा सूत्र आलेले नाही. कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार पाचवीपासून तीन भाषा महाराष्ट्रात आधीपासूनच शिकवल्या जातात. दक्षिणेतील तमिळनाडू वगळता इतर राज्येही पाचवीपासून हिंदी शिकवतात. याउलट हिंदी भाषिक राज्यांत हे सूत्र अवलंबिले जात नाही. उत्तरेतील राज्यांत तिसरी भाषा म्हणून कोणतीच दाक्षिणात्य भाषा शिकवली जात नाही. मग या तिसऱ्या भाषेचा बोजा फक्त हिंदी भाषिक नसलेल्या विद्यार्थ्यांवरच का? या नवीन धोरणात पहिलीपासून तिसरी भाषा शिकवलीच पाहिजे, असेही म्हटलेले नाही. हिंदी ही भाषा देशातील बहुसंख्यांकांची भाषा आहे. ती इतर भाषांना गिळंकृत करते, हे वेगळे सांगायला नको. उलट महाराष्ट्रात मराठीचा आग्रह धरला तर, त्यालाच संकुचित विचाराचे समजले जाते.

**सरकारी दावा क्रमांक २) लहान मुले कितीही भाषा शिकू शकतात. त्यामुळे पहिलीपासूनच तिसरी भाषा शिकायला हवी, असे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी म्हटले आहे.**

वस्तुस्थिती– लहान मुलांनी भाषा शिकण्यासाठीच आपला जन्म घालवायचा आहे का? पहिलीच्या मुलाचे दफ्तराचे ओझे कमी करायचे असे म्हणायचे आणि त्याला पुन्हा तिसऱ्या भाषेच्या बोज्याखाली मेटाकुटीला आणायाचे, हे कुठल्या शास्त्रात बसते? त्याच्या भवतालातून तो एखादी भाषा शिकेलही पण तिसऱ्या भाषेचा औपचारीक शिक्षणाचा आग्रह योग्य नाही, असे रमेश पानसे यांच्यासारख्या शिक्षणतज्ज्ञांनीही सांगितले आहे. पण हे दादा भुसे स्वतःला शिक्षणतज्ज्ञांपेक्षा जास्त हुशार समजू लागले आहेत. हिंदीला विरोधापेक्षाही तिसरी भाषा (कोणतीही) नको, असा प्रमुख मुद्दा आहे. सरकार तो मुद्दा लक्षात घ्यायला तयार नाही.

**सरकारी दावा क्रमांक ३) पहिलीपासून हिंदी इतर कोणत्या राज्याने सक्तीची केली आहे का?**

वस्तुस्थिती– पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या गुजरात राज्यातही अशी सक्ती नाही. उत्तरेतील राज्यांचा तर याच्याशी काही संबंधच नाही. तमिळनाडूने तर पाचवीपासूनच हिंदी शिकवायला विरोध केला होता. पहिलीपासून हिंदीचा तर, मुद्दा त्यांच्या प्राधान्यक्रमावर यायचे कारणही नाही. पण फडणवीस आणि दादा भुसे यांनीच याविरोधातील आंदोलन पाहून अशी सक्ती करणार नसल्याचे जाहीर केले होते. आंदोलन थंड झाल्यानंतर आणि शाळा सुरू होताच सक्तीचा आदेश काढला.

**सरकारी दावा क्रमांक ४) आम्ही हिंदीची सक्ती केलेली नाही. इतरही भाषा शिकण्याची मुभा आम्ही विद्यार्थ्यांना दिली आहे.**

वस्तुस्थिती– पहिल्या इयत्तेतील वीस विद्यार्थ्यांनी हिंदी व्यतिरिक्त भाषा शिकवणार असल्याची मागणी केल्यास सरकार त्याची व्यवस्था करणार, असा दावाही मंडळी करत आहेत. म्हणजे पहिलीच्या विद्यार्थ्यांनी आपला वेगळा गट तयार करावा आणि तशी मागणी करावी.

सरकार म्हणे अगदी अर्धमागधी (ही भाषा आहे) सुद्धा




शिकविण्याची व्यवस्था करणार असल्याचे दावे केले जात आहेत. जे सरकार शाळांना पुरेसे शिक्षक देऊ शकत नाही. ते म्हणे अशी व्यवस्था करणार. वीस मुलांनी एकत्र यायचे म्हणजे पालकांना त्यासाठी आधी एकत्र यावे लागणार. मग त्यांनी शाळेकडे मागणी करायची. शाळेने ती शिक्षण विभागाकडे करायची. मग शिक्षण विभाग सरकारला कळविणार. सरकार कधी तरी शिक्षक नेमणार. असे हे सारे चक्र सुरू राहण–ार. हे नाहीच झाले तर सरकार ऑनलाईन शिक्षणाची सोय करणार, म्हणजे यू ट्यूब वर एखादा धडा टाकून विद्यार्थ्यांना शिका म्हणणार. पण एवढा व्याप करण्याची गरज काय आहे? त्यापेक्षा मुलगा पाचवीत गेला की हिंदी शिकतोच आहे.

**सरकारी दावा क्रमांक ५) आम्ही हिंदी सक्तीची केली नसून मराठी अनिवार्य केली आहे. सीबीएसई आणि अन्य बोर्डाच्या विद्यार्थ्यांना मराठी सक्तीची केली असून ती न शिकविल्यास शाळेची मान्यता रद्द करणार– दादा भुसे**

वस्तुस्थिती– मराठी न शिकविल्यास शाळेला फक्त ५० हजार रुपये दंड करण्याची तरतूद कायद्यात आहे. शाळेची परवानगी वगैरे रद्द करणार असल्याची दादा भुसे यांची भाषा म्हणजे निव्वळ पोपटपंची आहे. असे काहीही नाही. राज्य मंडळ सोडून अन्य किती शाळांत मराठी शिकवले जाते, याचे उत्तर शून्याच्या आसपास येईल. काही शाळांनी नियमित शिक्षक वगैरे काही भरलेले नाहीत. त्यांनीही ऑनलाईन सोय केल्याची पळवाट काढली आहे. या मराठीत उत्तीर्ण झाले पाहिजे, याचीही सक्ती नाही. एकूणच मराठी शिक्षणाचा आनंद आहे.

**सरकारी दावा क्रमांक ६) पहिलीपासून हिंदी शिकविल्याने मराठीची दुर्दशा का होईल?**

वस्तुस्थिती–मराठीची अवस्था आताच बिकट आहे. हिंदीच्या आक्रमणामुळे मराठीचा वापर हा प्रसारमाध्यमांमध्ये कसा होतो, हे जरी पाहिले तरी मराठी मरणपंथाला लागलेली आहे, हे स्पष्ट होते. अगदी मराठी प्रसारमाध्यमांच्या कार्यालयांतही तेथील कार्यालयीन भाषा ही इंग्रजी झाली आहे. न्यायलये, रुग्णालये, कॉर्पोरेट कार्यालये येथून मराठी केव्हाच हद्दपार झाली आहे. बोलीभाषा म्हणूनच ती राहिली आहे. त्यामुळे मराठी माणूस मराठीपासून तुटला आहे. आता त्यात हिंदीची भर पहिलीपासून पडल्याने त्याला मराठीची गरजच राहणार नाही. भुसे यांच्याच दाव्यानुसार दैनंदिन वापरात हिंदीचा वापर जास्त होतो. त्यामुळे हिंदीचा आग्रह धरला आहे. दुसरे मंत्री प्रताप सरनाईक यांनीही हिंदीचे असेच गुणगाण गायले होते. काही दिवसांनी मुंबईत तर मराठी बोलणारा माणूस दुर्मिळ होईल. त्यामुळे ज्या लहान वयात मराठी व्यवस्थित शिकायला हवी. तेथे हिंदी आणून बसविल्यानंतर मराठीचे काय होईल, हे वेगळे सांगायला हवे का?

**सरकारी दावा क्रमांक ७) हिंदी भाषेचा एवढा दुस्वास करण्याची गरज नाही. तुम्हाला इंग्रजी चालते मग हिंदी का नको?– फडणवीस**

वस्तुस्थिती– इंग्रजीला पर्याय नाही, असे आता संपूर्ण भारताने ठरवले आहे. त्याला आता मराठी माणूस अपवाद राहू शकत नाही. हिंदीचा द्वेष किंवा दुस्वास करण्याचा संबंध नाही. ती भाषा मराठी विद्यार्थी पाचवीपासून शिकतोच आहे. तुम्हाला हिंदीचा एवढा पुळका का, की तुम्ही ती पहीलीपासून लादताय.

**सरकारी दावा क्रमांक ८) हिंदीमुळे राष्ट्रीय एकात्मता साधता येते.**

वस्तुस्थिती– व्यवसायाची गरज असल्यास तमीळ माणूस हिंदी शिकतो आणि हिंदी भाषक हा तमीळपण शिकतो. त्यामुळे ज्याला त्याला आपापली भाषा संरक्षण करण्याची आणि तिचे संवर्धन करण्याचा घटनेनुसार अधिकार मिळाला आहे. उलट हिंदी भाषकाने दुसरी एखादी भारतीय भाषा शिकून राष्ट्रीय एकात्मता वाढविण्यासाठी भर द्यायला हवा. हिंदी भाषक हे इतर राज्यांत जाऊन नोकऱ्या करणार, व्यवसाय करणार आणि त्यांची भाषादेखील गिळंकृत करणार, असे कसे चालेल?

आता राजकीय वस्तुस्थिती– महायुती म्हणून भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांना पाशवी बहुमत मिळाले आहे. आपण म्हणू ती पूर्वदिशा असा

राजकीय पटलावर मनसेने आक्रमक भूमिका या हिंदी सक्तीच्या विरोधात घेतली आहे. विशेष म्हणजे काँग्रेसने या सक्तीच्या विरोधात भूमिका घेतली. राष्ट्रीय पक्ष असूनही त्यांनी ही भूमिका घेतल्याबद्दल त्यांचे कौतुक करायला हवे. ...पृष्ठ क्र. १५ वर

# मारवाडी समाज आणि मराठी माणूस....

'चेंगट मारवाडी' सदर शब्द तुम्ही कधी न कधी कुठेतरी ऐकला असेल. पै पै गोळा करण्यासाठी अगदी गरजेच्या गोष्टींनादेखील नाकारणाऱ्या व्यक्तीला सर्वसाधारणपणे हे विशेषण लावले जायचे. अर्थात आपला मुलुख सोडून अनोळखी प्रदेशात स्थलांतर केल्याने, मिळणारा प्रत्येक रुपया भविष्यासाठी जपून ठेवणाऱ्या पूर्वीच्या पिढीतील मारवाडी समाजाला दोष तरी कुठल्या तोंडाने द्यावा ?

दोन चार पिढ्या मागे गेले तर महाराष्ट्रातील शहरंच नव्हे; तर, जवळपास प्रत्येक खेड्यात किमान एक मारवाडी कुटुंब पोहचले. स्वतःची भाषा, धार्मिक दैवते, खाद्यपदार्थ आदी गोष्टींवरून स्थानिकांशी संघर्ष न करता स्थानिक भाषा,पदार्थ आत्मसात करून स्थानिक दैवतांना देखील मानपान देऊन मारवाडी समाज मराठी माणसांच्या कुटुंबातील घटक झाला. अडीनडीला व्याजाने पैसे देण्यापासून गिऱ्हाईकाच्या प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत उधारीवर माल देणारा मारवाडी चोख व्यवहाराचे प्रतीक बनला. प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक समूहात गुण असतात त्याप्रमाणे दोषदेखील असतात आणि मारवाडी समाज त्याला अपवाद नाही पण आज आपण दोषांची नाही तर गुणांची आठवण करणार आहोत.

आज अचानक हे सगळं सांगायचे कारण म्हणजे, गेल्या काही काळापासून वेगवेगळ्या मागण्यांच्या निमित्ताने घडलेल्या घडामोडींनी आपल्या सगळ्यांचे जनजीवन ढवळून निघाले आहे आणि भविष्यात कदाचित ते आणखी प्रभावित होण्याची शक्यता आहे. इथल्या प्रत्येक जात समूहाला आपल्या जीवनस्तराला उंचावण्यासाठी सरकारी मदतीची अपेक्षा आहे आणि त्यासाठी राजकीय सत्ता मिळवण्यापासून वेगवेगळी आंदोलने करण्याचा रस्ता त्यांनी पकडला आहे. यात योग्य काय आणि अयोग्य काय यावर अनेक मतं व मतांतरे असू शकतात.

तुम्हाला आठवत असेल तर मागे मी भारतीय 'युनिकॉर्न' विषयी माहिती देणारा एक लेख लिहिला होता. स्वतःच्या कल्पक बुद्धीने स्थापन केलेली स्टार्ट अप कंपनी जेव्हा सात हजार कोटी रुपयांचे मूल्य गाठते, तेव्हा त्या कंपनीला युनिकॉर्न म्हटलं जातं असं त्यात सांगितले होते. गेल्या काही वर्षात हा दर्जा गाठलेल्या कंपन्यांच्या मालकांची नावे पहा, त्यात तुम्हाला प्रामुख्याने मारवाडी मुलं आढळतील.(मराठी उद्योजकांत ब्राह्मण मुलं आढळतात) अर्थात गेल्या कैक पिढ्या उद्योगाचे बाळकडू मारवाडी समाजात पाजले जाते त्याचेच हे फळ आहे हे कुणीही कबूल करेल.

याशिवाय सुरवातीला देश विदेशात स्थलांतर केलेल्या मारवाडी पिढ्यांचे आयुष्य त्या त्या प्रदेशात बस्तान बसवण्यात गेल्याने त्यांच्याकडून शैक्षणिक क्षेत्रात चमक दाखवण्याकडे दुर्लक्ष झाले होते. कदाचित ही सल की, संधी मारवाडी समाजाला डाचत असावी म्हणून हे शैक्षणिक मागासलेपण दूर करण्याविषयी त्यांच्यात खल झाला असावा. मला खात्रीपूर्वक माहिती नाही; परंतु, आजूबाजूला केलेल्या निरीक्षणातून आढळलेली गोष्ट म्हणजे गेल्या काळात मारवाडी समाजाने मोर्चे काढणे, तोडफोड करणे, सरकार दरबारी डोकेफोड करून घेणे यापैकी काहीही न करता स्वतःच्या समाजातील धनिकांच्या, दानशूरांच्या सहयोगातून शाळा,कॉलेज, मुलामुलींसाठी हॉस्टेल, गरजू मुलांना शिष्यवृत्ती, इतर मदत अशा अनेक प्रकारे स्वतःच्या जातीतील मुलांना शैक्षणिक मदत उपलब्ध करून दिली. त्याची फळं तात्काळ लागली नसतील; पण, आता तुम्हाला दिसून येते की पुण्यातील नाक कान घसा दात डोळे आदी क्षेत्रातील तज्ञ डॉक्टर मारवाडी आढळतील, पुण्यातील मेडिकल क्षेत्रावर डी फार्म केलेल्या मारवाड्यांचे वर्चस्व आहे, अनेक चार्टड अकाउंट-आणि काही प्रमाणात स्पर्धा परीक्षेतदेखील मारवाडी मुलं यश मिळवू लागली आहेत. म्हणजेच कुठल्या प्रकारची सरकारी मदत न मिळवतादेखील एक समाज योजनापूर्वकरित्या आपल्या पुढील पिढ्यांचे सकारात्मक नियोजन करू शकतो. ही गोष्ट आपल्या सर्वांसाठी मार्गदर्शक व प्रोत्साहनपर आहे, आपण या प्रकारचा सकारात्मक जातीयवाद करायला कुणाची काही हरकत देखील नसेल.

परंतु मराठी माणसानेदेखील हे सगळं नियोजन करण्याबरोबरच त्याला लागलेले तीन शाप तात्काळ दूर करणे गरजेचे आहे.

१) त्यातील पहिला शाप म्हणजे 'बडेजाव मीरवण्यासाठी खर्चिक कार्यक्रमांचे आयोजन करणे'. उदाहरणार्थ लग्न, वाढदिवस, कुंकूम तिलक, प्रि वेडिंग शूट पासून मुलाची पहिली दाढी काढण्याच्या कार्यक्रमात प्रसंगी कर्ज काढून लाखो रुपये उधळण्याची घाणेरडी सवय.

२) मराठी माणसाला लागलेला दुसरा शाप म्हणजे, गेल्या काही काळात त्याच्या डोक्यावर इतिहासाचे बसलेले भूत. तुम्ही आजूबाजूला पाहिलं तर अनेक मराठी व्यक्ती वास्तव जीवनाचे भान सोडून ऐतिहासिक विश्वात रममाण झालेली आहेत. शिवाजी महाराजांचे वंशज म्हणून फिरणारे कधी कुठल्या गड किल्ल्यावर जाऊन साधे दोन रुपये खर्च करत नाहीत; पण, सामान्य घरातील मराठी मुलं स्वतःच्या खिशाला खार लावून ऐतिहासिक गोष्टींवर लाखो रुपये खर्च करत आहेत. (अर्थात ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे त्यांनी हे देखील करायला हरकत नाही; परंतु, स्वतःचे भवितव्य धोक्यात घालून हे उद्योग केलेले खुद्द शिवाजी महाराजांना देखील रुचणार नाही हे देखील तितकेच सत्य आहे) त्याशिवाय इतिहासात आपला पूर्वज कुणी सरदार दरकदार असल्याच्या ओझ्याने आताच्या काळात कुणाकडे नोकरी धंदा करण्यास कित्येक मंडळी तयार होत नाहीत हे एक वेगळेच खूळ.

३) मराठी माणसाला लागलेला तिसरा शाप म्हणजे, राजकारणाचे गरजेपेक्षा जास्त असलेलं वेड. राजकीय नेत्यांकडे अस-लेला पैसा, सत्ता, प्रसिद्धी याची भूल मराठी तरुणांना इतकी पडली आहे की, महाराष्ट्रातील प्रत्येक गावात किमान पाच सरपंच फिरत आहेत. कारण गावातील चार लोक ओळखायला लागले की, ते लगेच 'भावी सरपंच, भावी नगरसेवक, भावी आमदार' बनून गावकी करत फिरणे हा शाप त्यांना लागला आहे. मग तो स्वप्नातील सरपंच, नगरसेवक वगैरे बनण्यासाठी स्वतःकडे असलेली जमापुंजी वापरून किंवा जमीनजुमला विकून जेवणावळी घालणे, वस्तू वाटप करणे, मनोरंजक कार्यक्रम आयोजित करणे आदी उद्योग मराठी माणूस करत बसतो. बरं हे करणाऱ्या लाखो तरुणांपैकी किती जणांना पक्षाची तिकिटे मिळाली, कितीजण आमदार खासदार झाले याचा हिशोब केला तर, हाती मोठा भोपळा येतो.

याशिवाय कित्येकदा चर्चा करताना 'मराठी माणूस काम करत नाही' वगैरे म्हटले जाते पण ते खरे नाही. कारण कुठल्याही प्रदेशातील स्थानिक माणूस हा त्याला राहण्या खाण्याची चिंता नसल्याने निष्काळजी बनलेला आढळून येतो परंतु स्थलांतर करून आलेल्या माणसाला जम बसवायचा असल्याने त्याला जेवणावळी घालणे, पूर्वजांचा मोठेपणा मिरवणे, राजकारण करत फिरणे परवडत नसते. तो काम एके काम एवढा हिशोब ठेवतो, त्यामुळे दुबई, अमेरिका, युरोप, आफ्रिका वगैरे वगैरे देशात जी जी मराठी माणसे गेली आहेत ती तिथे जाऊन रुजली, वाढली ती स्वतःची कल्पकता, कष्टाच्या बळावरच ना? म्हणूनच मराठी माणूस काम करत नाही ही गोष्ट पूर्णपणे सत्य नाही. परंतु वर उल्लेख केलेले तीन शाप त्याने तात्काळ दूर केले आणि मारवाडी समाजाचा कित्ता गिरवून शैक्षणिक सुसंधी निर्माण करण्याकडे लक्ष दिले तर, त्याचे भवितव्य इथेदेखील उज्वलच आहे याबद्दल कुठलीही शंका नाही.

*टीप : या लेखातील शब्दांत, मांडणीत कदाचित एखादं दुसरी चूक असेल पण त्याकडे दुर्लक्ष करून आशय लक्षात घ्यावा. तसेच काही मनोवृत्ती या जन्मजात विकृत असल्याने त्यांच्या तक्रारी,कांगावे याकडे दुर्लक्ष करून आपला रस्ता चालावा व हीन साधावे.*

**- तुषार दामगुडे**

## मराठीच्या मरणकळा आणि फडणवीस यांचे वकिली चातुर्य... ...पृष्ठ क्र. १४ वरुन

शिवसेना (उद्धव ठाकरे) यांची भूमिका अनाकलनीय आहे. त्यांनी या सक्तीच्या विरोधात आवाज उठवलेला नाही. बाळासाहेब ठाकरे असते तर, त्यांनी उद्धव ठाकरे यांचे कान उपटले असते. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे नेहमीप्रमाणे राजकीय वारे पाहून निर्णय घेतील. महाराष्ट्रातील लोकांचा विरोध दिसला तर ते विरोधात जातील अन्यथा भाजपच्या धोरणाला अप्रत्यक्ष पाठिंबा देतील.

त्यामुळे मराठी भाषकांनीच आता जागे व्हायची वेळ आलेली आहे. आपल्यालाच आपल्या भाषेविषयी आस्था नसेल तर तिचे मरण अटळ आहे. अभिनेते, पत्रकार, कलाकार, लेखक अशांनी तरी थेटपणे विरोध करायला हवा. किती दिवस दाक्षिणात्य अभिनेत्यांचे त्यांच्या भाषाप्रेमासाठी कौतुक करायचे? ते कौतुक करून घेण्याची संधी अनेक महाराष्ट्र भूषण, आणि पद्मभूषण मंडळींना मिळाली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा भाषावार प्रांतरचनेला विरोध होता. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात आताच्या भाजपचे पूर्वसुरी नव्हते. त्यामुळे त्यांना महाराष्ट्र हा मराठीबहुल असावा, असे त्यांना वाटत नसावे. उत्तरेत ज्या पद्धतीने हिंदुत्वाच्या नावाखाली भाजपने आपले सत्ताबळ वाढवले आहे. त्याचाच वापर त्यांना महाराष्ट्रात करायचा आहे. त्यामुळे हा धोका वेळीच ओळखला पाहिजे. अन्यथा अभिजात मराठीचा दर्जा नावाला राहून, ती अल्पसंख्यांकांची भाषा ठरेल.

त्यामुळे सरकारच्या या निर्णयाच्या विरोधात, समस्त मराठी माणसांनी वेळ पडल्यास रस्त्यावर उतरण्याची तयारी ठेवायला हवी. नुसते लाईक बटन किंवा सोशल मीडियावर कॉमेंट देऊन हे सरकार ऐकेल असे वाटत नाही.

**- योगेश कुटे**, पुणे.

**मराठी भाषेचं बाजारपेठेतील महत्त्व घसरत चाललंय... पण, आपल्याला ही बाजारपेठेतील किंमत कशी वाढेल हे पाहणं अत्यंत गरजेचं असून, त्यासाठी भांडवली व्यवस्थेला हादरे द्यावे लागतील. हा प्रश्न फक्त हिंदीभाषिक म्हणून उत्तर-भारतीयांपुरता मर्यादित नाहीये; तर, गुजराती आणि मारवाडी यांच्या भांडवली-व्यवस्थेला हादरा देण्याचा सुद्धा आहे आणि म्हणूनच, अनेक गोष्टींसोबत कंत्राटी-कामगारपद्धतीचं उच्चाटन हे प्रामुख्याने व्हायला पाहिजे.** देशासोबतच, प्रामुख्याने महाराष्ट्रासमोरील हा सगळ्यात मोठा प्रश्न आहे. या गुजराथी-भाषिकांच्या भांडवली व्यवस्थेला हादरे दिलेत, तरच तुमची मराठी भाषा आणि मराठी माणूस सुरक्षित राहील, नाहीतर त्याचं महाराष्ट्रातून उच्चाटन होईल. अनेक आंदोलनं करताना, पर्यावरणीय महासंकटाच्या संदर्भात आम्हाला सांगितलं जातं की, कोण कुठे जन्माला येतो हा अपघात असतो. कोण कोकणात जन्माला येतो तर, कोण आणखी कुठे जन्माला येतो; मग, आमच्या सगळ्यांचा महाराष्ट्रातला जन्मसुद्धा एकदाचा अपघात ठरवा आणि आम्हाला अरबी समुद्रात ढकला...नाहीतरी, आमच्या महापुरुषाचा-महानायकाचा पुतळा तुम्ही अरबी समुद्रात उभारत आहातच. मराठी तरुणतरुणींचे संसार आणि व्यवसाय फुलण्यासाठी (मुं. ठा. पु. रा. ना. म्हणजेच, मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, नाशिक अन् नागपूर) शहरं मोकळी करुन घ्यावी लागतील.... आपल्याला नजिकच्या भविष्यात प्रत्येक प्रौढ व्यक्तिमागे फक्त एक दुकान-एक मकान अशी कडक धोरणं राबवावी लागतील...तरच आणि तरच महाराष्ट्रात मराठी माणसाचा बोलबाला होईल, मराठी भाषेला पुन्हा एकदा कायमस्वरुपी महत्त्व प्राप्त होईल....

***...राजन राजे***

# "इंदिरा गांधींचं परराष्ट्र धोरण : धर्मावर नव्हे, न्यायावर उभं राष्ट्र"

इंदिरा गांधींची हत्या झाली तेव्हा यासर अराफत रडले. ते म्हणाले, "माझी बहीण गेली." गाझा पट्टीतील अनेक घरांमध्ये त्या दिवशी अन्न शिजवले गेले नव्हते. इराण, इराक, पॅलेस्टाईन – सर्वत्र शोककळा पसरली होती, जणू काही जवळचे कोणीतरी गेले आहे. पश्चिम आशियात भारताचे स्थान असे होते. इंदिरा गांधींचे परराष्ट्र धोरण असे होते. सोनिया गांधींनी आज मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणावर जे प्रश्न उपस्थित केले आहेत ती केवळ टीका नव्हती, ती त्या धोरणाच्या हत्येबद्दल शोककळा होती, ज्याने जगात धार्मिक ध्रुवीकरणाच्या वर जाऊन भारताला न्याय आणि संतुलनाचे उदाहरण बनवले होते.



त्या अगदी बरोबर म्हणाल्या – "भारताचे दशके जुने संतुलित आणि स्पष्ट परराष्ट्र धोरण धूळ खात टाकण्यात आले आहे."

इंदिरा गांधी धर्म पाहून परराष्ट्र धोरण ठरवत नव्हत्या, किंवा मतपेढी पाहून त्यांनी देशाची दिशा ठरवली नाही.

त्या यासर अराफत यांना केवळ धार्मिक नेते मानले नाहीत, तर स्वातंत्र्यसैनिक मानत होत्या. जेव्हा जग त्यांना दहशतवादी मानत होते, तेव्हा भारताने त्यांच्या आत्मनिर्णयाच्या अधिकारासाठी आवाज उठवला.

१९७४ मध्ये इंदिरा गांधी इराणला गेल्या. शाह मोहम्मद रझा पहलवी यांनी त्यांचे ऐतिहासिक स्वागत केले. तेहरानचे रस्ते लोकांनी गर्दीने भरलेले होते.

भारत आणि इराण केवळ तेल किंवा व्यापाराबद्दल बोलत नव्हते – तर शिक्षण, विज्ञान आणि संस्कृतीमध्ये खोल भागीदारीचा पाया घातला. भारत कधीही इराणच्या इस्लामिक चारित्र्याला घाबरला नाही, आणि इराणने कधीही भारताच्या धर्मनिरपेक्ष चारित्र्यावर बोट दाखवले नाही.

आणि सद्दाम हुसेन? भारताने इराकच्या या शक्तिशाली आणि वादग्रस्त नेत्याशीही संबंध निर्माण केले.

का? कारण भारताला तेलाची गरज होती, कामगारांना रोजगाराची गरज होती, आणि पश्चिम आशियात धोरणात्मक स्थिरता आवश्यक होती.

इराकने भारताला सवलतीच्या दरात तेल दिले. हजारो भारतीयांनी तिथे काम केले – केवळ पैशासाठी नाही तर भारतीय ध्वजावरील श्रद्धेमुळे. १९७१ मध्ये जेव्हा भारताने पाकिस्तानचे दोन तुकडे केले, तेव्हा जगातील महासत्ता भारतावर हल्ला करत होत्या.

पण इराण, इराक, पॅलेस्टाईन यांनी भारताला विरोध केला नाही. उलट, त्यांना हे समजले की भारत न्याय करत आहे.

आणि जेव्हा अमेरिकेचा सातवा ताफा भारताला घाबरवण्यासाठी हिंद महासागरात घुसला, तेव्हा फक्त रशियाच उभा राहिला नाही; पण, पश्चिम आशियातील मुस्लिम देशांनीही भारताविरुद्ध वातावरण निर्माण होऊ दिले नाही.

का?

कारण भारताच्या परराष्ट्र धोरणात दुटप्पीपणा नव्हता. ते धार्मिक तुष्टीकरण नव्हते, ते एक स्पष्ट, राष्ट्रीय हितावर आधारित धोरण होते.

आणि आज... भारत गाझावर गप्प आहे. इस्रायलच्या मांडीवर बसून तो "वसुधैव कुटुंबकम्"असा जयजयकार करतो. ते शब्द आहेत, आत्मा नाहीत.

इंदिरा गांधी इथे असती तर, भारताने इस्रायल आणि इराण या दोघांशीही बोलले असते. त्याने जगाला आठवण करून दिली असती की, भारत धर्माची नाही तर, न्यायाची बाजू निवडतो.

***...निरंजन टकले***

फेसबुक, ट्विटर (एक्स), इंस्टाग्राम यांनी, आधारकार्ड सक्तीचं केलं पाहिजे... त्याशिवाय, भाजपाचा 'सायबर-मवालीपणा' थांबणार नाही. नालायक आणि नीच ट्रोल्सपासून, समाज वाचवायचा असेल तर, हे आवश्यक आहे. ट्विटर आणि फेसबुकवर, मी अक्षरशः हजारो ब्लॉक केलेत; पण, महाराष्ट्रात आणि देशात, यांनी अशी काही यंत्रणा तयार केली आहे की, दररोज हजारो फेक अकाउंट तयार करतात आणि विरोधकांबाबत अचकट-विचकट बोलणं सतत चालू ठेवतात. या पक्षाकडे एवढा काळा पैसा आहे की, रोज लाखो फेके तयार करणारी यंत्रणा, ते तयार करु शकतात. सोशल मीडियावरचे फेक अकाउंट्स, चॅनेल्सवरचा प्रपोगंडा, बोगस मतदान आणि ईव्हीएम हटवलं; तर, हा पक्ष एखादी ग्राम पंचायतदेखील जिंकू शकणार नाही !!!

# डोळ्यात झणझणीत अंजन...

"UPSC' आलेला रिझल्ट, **१७५७ पैकी एकट्या बिहारने पुन्हा रचला इतिहास... ११२३ बिहारी बनले IS अधिकारी... म्हणजे १७५७ पैकी वजा ११२३ – इतर ०६३४**

आपली पोरं केव्हा करणार असा वेडेपणा? की, फक्त महिनाभर दहीहंडी सराव, पंधरा दिवस गणेशोत्सव, दहा दिवस दांडीया-नवरात्रोत्सव आणि वर्गणी, दहा दिवस साईबाबांची पालखी, महिनाभर पंढरपुरची वारी, अधेमध्ये पावसाळी पिकनिक सहा दिवस, हंगामी पावसाळी क्रिकेटचे सामने... मग, कब्बडीचे सामने आणि नंतर राजकीय पक्षांच्या सतरंज्या उचलत बसणार...??? अथवा, आपले राजकीय पूर्वग्रह ठेवत, अकारण वाद घालत बसणार आणि पुढाऱ्यांची तळी उचलत बसणार.

दिवसभर बाप रानात राबतो, नोकरी करतो, रिक्षावर किक मारतो... लेक काय करतो, दोन हजारांचे बूट, दोन हजाराची जीन्स, पंधराशेचा टी-शर्ट, दोनशे-अडीचशे रुपयांचा 'पार्क ॲव्हेन्यु'चा सुवासिक सेन्ट मारुन, नाक्यावर चमकेशगिरी करणार, हिरोसारखा भांग पाडणार, भरपूर बुद्धी आणि हुशार असूनही कमवायची काही अक्कल नाही... आता उरलयं काय; तर, आज काय वर्धापनदिन, उद्या काय नेत्यांचा न विसरणारा वाढदिवस, त्यांचे बॅनर-झेंडे, परवा काय आंदोलनात भाग, तेरवा काय तर, चार-आठ दिवस पोलीस कष्टडी, नंतर काय... वर्षे दोनवर्षे कोर्टाची वारी, लय भारी... आला ना राग? कारण, आम्ही मराठी बहुजनांची लेकरं आहोत, वाकेन पण मोडणार नाही!

अजुनही वेळ गेली नाही रे पोरांनो, सुधरा... पुढे खूप भविष्य आहे तुम्हाला. मनाला टोचेल असेच लिहीले आहे, चालेल मला... चार शिव्या घाला; पण, कार्यकर्ते नको तर, अधिकारी बना !!!

***– समाजमाध्यमातुन साभार***

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**